# बानमी पसरली

BVBK-0400308

BVBK-0400308

१३ JUL 1984

# १. बातमी पसरली*

डिटेक्टिव्ह डीटी आणि कंपूच्या पहिल्या यशस्वी कामगिरीची बातमी रामनगरात वाऱ्यासारखी पसरली. रामनगर या छोट्याशा गावातली चार शाळकरी पोरं एका चोरीचा पत्ता लावू शकतात ही गोष्ट त्यांना खरीच वाटेना. पण त्यामुळे डीटी म्हणजे दिनेश रांगणेकर, अन्या व पमी कुलकर्णी आणि रम्या कामत या चौघांचा भाव वाढला. रम्या तर सुट्टी संपायची वाट पाहात होता. कधी एकदा शाळा उघडते आणि आपण आपलं शौर्य सगळ्या दोस्तांना सांगतो असं त्याला झालं होतं. पमीच्या घरी तिची मावशी सुट्टीत आली होती. तिला पमी म्हणाली,

'मावशी तू एकदा डीटीला पाहाच.'

अन्या तिथे होताच. तो थोडीच पमीला चिडवण्याची संधी घालवणार!

'अॅहॅहॅ डीटीला काय पाहायचा! कामगिरी सगळ्यांनी केली' असं म्हणून त्यानं आपलं नाक पमीसमोर खाजवलं. पमीला राग आला. पमी खुशीत आली की आपल्या नकट्या नाकाचा शेंडा खाजवीत असे. आणि अन्या नेहमी तिची यावरून चेष्टा करी. ती म्हणाली, 'मावशी याचे काही ऐकू नकोस ग. आमच्या सगळ्या कंपूचा डीटी हाच लीडर आहे. अग काय त्याचा बंगला आहे! त्याची खोली टॉप!' पमीनं डीटीचं अर्धा तास पुराण लावलं होतं. शेवटी मावशीसुद्धा वैतागून म्हणाली –

'ते ठीक ग, पण तू कशाला पोरांच्यात खेळतेस?'

---

* यासाठी डिटेक्टिव्ह डीटी आणि कंपूची पहिली कामगिरी 'देव चोरीला गेले' जरूर वाचा.

'माझं हेच म्हणणं आहे' अन्यानं मावशीची री ओढली.

'तुला काय करायचंय दादिटल्या! ...मावशी, आमच्या कंपूत मुलगा किंवा मुलगी असा फरकच नाही. प्रत्येकाने आपलं काम करायचं.'

अगं पण तू मोठेपणी डिटेक्टिव्ह होणार आहेस का?' मावशीनं हसून विचारलं.

'हो, होईन की. त्यात काय झालं?'

'हो काय! उंदराला घावरणारी मुलगी म्हणे डिटेक्टिव्ह होणार! तोंड पहा.'

'मग तू नाही का कुत्र्याला घाबरतोस!' पमी जोराने म्हणाली.

'मग! कुत्रा चावतो म्हटलं...'

'उंदीरसुद्धा च्यावतो म्हटलं' पमी त्याला वेडावीत म्हणाली.

आता या दोघा बहिणभावंडांची जुंपणार असं पाहून मावशीनंच विषय बदलला. तरीसुद्धा तिला या कंपूबद्दल कौतुक वाटत होतं. सुट्टीत शाळेतल्या मुलांनी अशी कामं केली तर ती गावाला फार उपयोगी पडतील असं तिला वाटलं. पमीनं मावशीला पहिल्या कामगिरीची सगळी हकिगत तर सांगितली होतीच; शिवाय जोशी-बाईंचं वर्णन करताना त्यांची इतकी सुरेख नक्कल केली की पमीच्या आईची व मावशीची हसता हसता मुरकुंडी वळली होती.

अन्याच्या आईला अन्यामध्ये एक फरक जाणवू लागला आणि तो म्हणजे अन्याची खोली आता पूर्वीसारखी रद्दीभांडार राहिली नव्हती. हळूहळू व्यवस्थितपणाकडे अन्या वळू लागला होता. आईने त्याबद्दल विचारल्यावर तो म्हणाला –

'मग! डिटेक्टिव्ह माणसानं अव्यवस्थित राहून चालायचं नाही. ही बघ माझी डायरी.'

अन्याची डायरी पाहून त्याची आई चकीतच झाली. त्या डायरीचं एक पान तिनं सहज उघडलं तर त्यात पुढील उतारा होता.

## विद्यार्थी म्हणजे काय ?

विद्या शिकणारा तो विद्यार्थी, ही व्याख्या सोपी असली तरी कोणती विद्या शिकावी व तीच का शिकावी हे समजून घेणं जास्त महत्त्वाचं तसंच कठीणही आहे. आता चोरी करणे, खिसा कापणे याही विद्याच होत. मग या विद्या आपण शिकाव्यात का ? नाही यांनी आपल्याला थोडा वेळ सुख मिळेल पण बरीच माणसं दुःखी होतील. कदाचित आपल्याला तुरुंगात जायची शिक्षाही होईल. ...मग कोणती विद्या शिकावी ? आपल्या पूर्वजांनी तीन तत्त्वे सांगितली आहेत. सत्यं – शिवं – सुंदरम्. ज्या विद्येने या तत्त्वांचा विचार होतो. आणि त्यापासून आनंद मिळतो ती विद्या शिकावी. यासाठी नेहमी चांगले विचार मनात आणावेत.

हा उतारा अन्याच्या डायरीत पाहून अन्याच्या आईने त्याला विचारलं–

'कायरे, कुठून आणलास हा उतारा ?'

'डीटीच्या डायरीतून. त्याच्या डायरीत असे कितीतरी विचार आहेत.' अन्याच्या आईनं डीटीला भेटायला सांग म्हणून अन्याला सांगितलं. अन्याला आईचं आश्चर्य वाटलं.

• •

रामनगरात एक दैनिक निघे. त्याचं नाव 'रामनगरवार्ता'. या दैनिकात पहिल्याच पानावर पोरांनी केलेली धमाल ही आपल्याच कामगिरीची बातमी पाहून रम्या उर्फ रमेश दत्तात्रय कामत तर वेडाच झाला. त्यानं आपल्या आईवडलांनाही ते दैनिक धड वाचू दिलं नाही. तरी त्याच्या आईनं त्याच्या हातून ते खेचून घेऊन सगळं वाचून काढलं. बातमीदारानं मोठ्या चटकदार भाषेत ती बातमी दिली होती. डिटेक्टिव्ह डीटीच्या कंपूला कृष्ण आणि सवंगड्यांची त्यानं उपमा दिली होती. बातमीत लिहिलं होतं—

'आम्ही लहानपणी कृष्णलीला ऐकून थक्क व्हायचो. तो सावळ्या रंगाचा, मोरपिसांचा मुगूट घातलेला मिष्किल कृष्ण आणि त्याच्या दोस्तांच्या गोष्टी ऐकून आम्हाला फार आनंद व्हायचा. तसा आनंद या डिटेक्टिव्ह डीटी आणि कंपूच्या लीला ऐकून आम्हाला झाला. हल्लीच्या या शास्त्रप्रगत देशात या मुलांनी केलेल्या कामगिरीचं कौतुक करावं तेवढं थोडं. जोशीबाईकडे झालेल्या चांदीच्या देवांच्या चोरीचा शोध ज्या शिताफीनं या कंपूनं लावला त्याबद्दल आम्ही त्यांना **रामनगरचे स्कॉटलंडयार्ड** अशी पदवी देतो. त्यांनी अशाच कामगिऱ्या करून गावाचं नाव मोठं करावं. पोलिस इन्स्पेक्टर जगतापसाहेब यांनी या मुलांना मदत करण्यात आणि त्यांच्या हौशीत रस घेण्याचा जो प्रयत्न केला तोही आम्हाला कौतुकास्पद वाटतो. नाहीतर ही एवढीशी पोरं! ही काय करणार! ही मोठ्या माणसांची नाकमुरडी वृत्ती त्यांनी दाखविली नाही हे विशेष ..'

रम्यानं आपली चड्डी वर खेचत ही बातमी आधी आईवडलांना सांगितली होतीच. (चड्डी वर खेचायची त्याला सवय लागली

होती) पण वर्तमानपत्रात आल्यावर त्यांना ती खरी वाटली. बातमी वाचल्यावर त्याची आई म्हणाली,

'हे सगळं सुट्टीत ठीक आहे रम्या. पण शाळा सुरू झाल्यावर मी तुला असलं काही करू देणार नाही. तो रांगणेकर आहे श्रीमंत. ते कुलकर्णीसुद्धा पैसेवाले आहेत. पण आपण आहोत गरीब. आपल्याला हे छंद परवडायचे नाहीत. समजलं ना! तेव्हा तू त्यांच्या भानगडीत पडू नकोस.'

'खेळू दे ग त्याला' रम्याचे वडील म्हणाले.

'खेळू दे काय? त्या पोलिसांच्या ताब्यात जाऊन मार खाल्ला म्हणजे मग! ते साळवी केवढे आहेत! ह्यांच्या फुंकरीनं हा उडून जायचा.'

साळवींचं नाव आईने काढल्या बरोबर त्यांची मूर्ती त्याच्या डोळ्यासमोर उभी राहिली आणि त्याचं त्यालाच हसू आलं.

• •

इकडे साळवीसाहेब आपल्या कचेरीत तोच विचार करीत होते. गावातल्या चिमुरड्या पोरांनी आपली अशी गंमत करावी याचा त्यांना फार राग आला होता. रागाच्या भरात त्यांनी जोरानं आपल्या हाताची मूठ टेबलावर आपटली. पण त्या धक्क्याने ते ज्या खुर्चीवर बसले होते तिचा एक पाय मोडून ते जवळजवळ खाली कोसळले. त्यामुळे तर त्यांना पोरांचा फार राग आला. मोडलेल्या खुर्चीचा पाय त्यांनी हातात घेतला. जणू काय मी त्या पोरांना या पायाने बडवून काढीन असा त्यांचा आवेश होता. रागातच त्यांनी तो पाय टेबलावर आपटला आणि शेजारच्या बाकावर बसले.

त्या पोरांचा विचार करायचा नाही असं म्हणत त्यांनी पोरांचाच विचार सुरू केला. त्यांच्या डोळ्यासमोर सारखा डीटी (उर्फ दिनेश रांगणेकर) दिसत होता. केव्हातरी हा पोऱ्या आपल्या तावडीत सापडेल, त्याला लॉकपमध्ये ठेवू आणि इन्स्पेक्टर साहेबांना दुसऱ्या दिवशी कळवू असले वेडेवाकडे विचार त्यांच्या डोक्यात थैमान घालत होते.

तसं म्हटलं तर त्यांना इन्स्पेक्टर जगतापसाहेबांचाही राग आला होता. आपल्या हाताखालच्या माणसावर विश्वास ठेवण्याऐवजी त्यांनी त्या चिमुरड्या पोरांवर विश्वास ठेवला ही गोष्ट साळवींना फार खटकली होती. पण करणार काय ? जगताप त्यांचे साहेब होते. तरी पण केव्हातरी साहेबांना या पोरांचा शहाणपणा आपण पुराव्यासह पटवून देऊ अशी त्यांना आशा वाटत होती. या विचारातच असताना टेलिफोन बेल खणखणली.

'कोण आहे ?'

'हॅलोऽऽ रामनगर पोलिस स्टेशन ?'

'हॅलो... हो. मी साळवी बोलतोय.'

'हॅलो साळवी. नमस्कार.'


'कोण आपण ?'

'माझा आवाज तुम्ही ओळखला नाही ?'

'हे पहा, मी मास्तर नाही. नीट बोला.

'मग ओळखा ना –'

'आरतिच्या... नीट सांगता का. ?' असे म्हणून त्यांनी टेबलावरचा मोडलेला पाय हातात घेतला. जणू काही फोन




करणारा आपल्या समोर उभा आहे आणि आपली चेष्टा करतोय, त्याला वडवलाच पाहिजे असा त्यांचा आवेश होता.

ते पुन्हा म्हणाले, 'कोण तुम्ही?'

'हरलात? मी दिनेश रांगणेकर उर्फ डीटी. मी तुमचं अभिनंदन करायला फोन...' पुढचे शब्द न ऐकताच साळवींनी फोन आपटला होता. ज्या पोरट्याचं तोंड पाह्यची त्यांना इच्छा नव्हती त्याचाच फोन . म्हणे अभिनंदन! हं...' त्यामुळे साळवी जास्तच वैतागले. इतक्यात पुन्हा फोनची घंटा खणखणली. पण साळवीसाहेबांनी फोनकडे पाहिलं सुद्धा नाही. कारण तो पोरगा फोनवर आता सारखी आपली गंमत करणार असंच त्यांना वाटलं.

वास्तविक फोन होता – जगतापसाहेबांचा. त्यांना साळवींना एक महत्त्वाची कामगिरी सांगायची होती.

पण साळवी ती ऐकण्याच्या मन:स्थितीत होतेच कुठे ?

रिंग वाजते पण कोणी फोन घेत नाही हे पाहून जगतापांना नवल वाटलं. रिंग वाजली तरी साळवी फोनला हात लावेनात. शेवटी त्यांनी रिसीव्हर उचलून ठेवला... इतके ते चिडले. गावभर साळवीसाहेबांची नाचक्की झाली होती. जो जो भेटेल तो तो त्यांना विचारीत होता की तुम्ही कसे चुकलात ! हा सगळा राग साळवीसाहेबांच्या चेहऱ्यावर पावडरीसारखा चिकटून राहिला.

• •

इकडे डीटी शांत होता. कंपूच्या कामगिरीचा त्याला आनंद झाला नव्हता असं मुळीच नाही. पण मामा पत्रात काय म्हणाला होता ते त्याला आठवलं.मामानं लिहिलं होतं, 'हे बघ दिनेश, एखाद्या यशानं माणसानं चढून जाऊ नये. आपण प्रामाणिकपणे काम करावं. मग एखाद वेळेस अपयश आलं तरी ते सहज पचवायची ताकद येते...' डीटीने सभा बोलावली. त्याच्या घरी म्हणजे गुप्त मंजुषेत सभा भरली. (हे नाव रम्यानं दिलं होतं. सगळे त्याला आता जीएम् म्हणत).

सगळ्यांना काय बोलू न् काय नको असं झालं होते.

डीटी- धमाल आतापर्यंत मी दोनशे माणसांना तरी सांगितलं असेल–' रम्या आपली चड्डी वर खेचीत म्हणाला.

'आणि मी तेवीस पत्रं लिहीली' पमी आपल्या नाकाचा शेंडा कुरबाळीत म्हणाली.

'अॅहॅह् पमे, पण पोष्टात मी टाकली.'

डीटीने ही सगळी बोलणी थांबवायची नेहमीची युक्ती बाहेर काढली. ती म्हणजे कॅडबरी. कॅडबरी तोंडात गेल्याबरोबर सगळ्यांची तोंडं सिलबंद झाली. डीटी बोलू लागला–

'हे पहा! आपली पहिली कामगिरी झाल्यावर आज प्रथमच आपण जमतो आहोत. तेव्हा मी तुम्हाला काय सांगतो ते ऐका. आपली बातमी जगजाहीर करायची घाई करू नका. आपण लहान आहोत. आपल्याला खूप करायचय. आणि आपलं कौतुक दुसऱ्यांनी करावं, आपण करू नये. म्हणून म्हणतो घाई करू नका. यापुढे काळजी घ्या.'

डीटीची ही वाक्यं ऐकल्यावर रम्याचं आणि पम्याचं कॅडबरीनं भरलेलं तोंड कडवट झालं.

'हे कायरे! आम्ही कोणाला सांगायचं नाही वाटतं? वारे वा!' पमीने थोडसं घुश्शातच त्याला विचारलं.

तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करीत डीटीनं सगळ्यांना विचारलं, 'आता पुढे काय!'

सगळ्यांच्या डोळ्यासमोर तेच प्रश्नचिन्ह होतं तरी पण सगळे डीटीकडं पाहू लागले.

□ □ □

# २. एक चमत्कारिक घटना

डीटीच्या डोक्यात सुद्धा चटकन सांगण्यासारखं काही नव्हतं त्यामुळे तोही थोडासा गडबडलाच. पण तेवढ्यात त्याला काही सुचलं आणि तो म्हणाला,

'हे पहा, आपली एक कामगिरी झाली. प्रत्येक वेळी आपल्याला अशी कामगिरी मिळेलच असं मुळीच नाही.'

पमी मध्येच म्हणाली,

'मग आपण करायचं काय ? नुसतं जमायचं ? '

'नाही ना... सतत काहीतरी करीत रहायचं... म्हणजे मी सांगतो काय करायचं ते.. आपण निरनिराळ्या युक्त्या शोधून काढू. '

'युक्त्या ?' रम्यानं विचारलं.

'हं. आपण हवामानाची नाही का युक्ती शोधली. तशा नवीन काही कल्पना, युक्त्या शोधून काढू. आता पुढच्या सभेला आपण जमू तेव्हा कोण नवीन कल्पना आणायला तयार आहे ?'

डीटीने विचारताच रम्याने आपली चड्डी वर खेचून ते आव्हान स्वीकारले. नाहीतरी बौद्धिक करामती करायला तो तयार होताच.

'शाबास रम्या... तू आणशील ती कल्पना सगळ्यांना आवडली तर तिची प्रॅक्टिस करावी लागेल. कारण या सगळ्या गोष्टी अगदी अंगवळणी पडल्या पाहिजेत. . त्याचप्रमाणे निरनिराळ्या डिटेक्टिव्ह लोकांच्या गोष्टी वाचायच्या- सांगायच्या... '

'त्या तूच सांग बाई...' पमी म्हणाली.

'सांगू ? ऐका... काही दिवसापूर्वी पपांनीच मला एका डिटे-क्टिव्हाबद्दल सांगितलं होतं. इटाली देशात एक डिटेक्टिव्ह आहे. जगप्रसिद्ध आहे तो. त्याने १९४५ मध्ये इटालीतल्या एका पोस्ट ऑफिसवर लाखो रुपयांचा दरोडा पडला होता त्याचा शोध लावला. बरं का पमे! १९६७ मध्ये तो मोठा ऑफिसर झाला तेव्हा त्यानं आणि त्याच्या हाताखालच्या माणसांनी केवळ सहा महिन्यात चार खून, २५९ चोऱ्या आणि इतर ५०० गुन्हे पकडले.'

'बाई ग ऽऽ. सहा महिन्यात एवढं केलं त्यांनी?' पमी आपलं नाक गोंजारीत डीटीला विचारीत होती.

'मग! एकदा तर त्याने एका मोठ्या रहस्याचा शोध लावण्याकरता प्लंबरचा वेष घेतला होता.'

'प्लंबर म्हणजे?' अन्याने पाय हालवीत विचारलं.

'प्लंबर म्हणजे नळ दुरुस्त करणारा' रम्यानं उत्तर दिलं.

'काय नाव काय, त्याचं?' पमीनं विचारलं.

'त्याचं नाव मरिओ नारडोन त्याची गंमत अशी की तो दुस-ऱ्यांना अगदी क्षुल्लक वाटणारे धागेदोरे नीट तपासून पाहातो आणि या धाग्यादोऱ्यावरूनच त्यानं हजारो गुन्हे पकडले.'

'मग मी नव्हतं का विडीचं थोटूक पाहिलं' रम्या म्हणाला.

'तेच. पण त्यावेळी तुला तो धागादोरा असेल असं वाटलं नव्हतं खरं की नाही? तेवढ्यासाठी अगदी लहानसहान गोष्टींचं सुद्धा निरीक्षण करावं. साधा कागद जळलेला असतो. पण तो जळलेला कागदसुद्धा वाचता येतो..' डीटी त्या मरिओच्या आणखी काही मजेशीर गोष्टी सांगू लागला.

गुप्तमंजुषेत पुन्हा सभा भरली तेव्हा सगळ्यांचं लक्ष रम्याकडे होतं. डीटीनं त्याच्यासाठी आपली प्रमुखाची खुर्ची त्याला दिली तेव्हा तर रम्या चक्क लाजून त्या खुर्चीत बसायला नको नको म्हणायला लागला. थोडी चेष्टा गंमत झाल्यावर डीटीनं एकदम विषयाला हात घातला. त्यानं विचारलं –

'काय झालं रम्या ?'

'हे बघ डीटी. मी तीन खुणा तयार केल्या आहेत. खुणा म्हणजे हालचाली. अशा हालचाली की ज्या आपल्याला एकमेकात दुसऱ्यांच्या देखत काही गुप्तसंदेश देऊ शकतील. उदा. हे बघ. मी भुवईवरून हात फिरवतोय... आता ही माझी क्रिया माझ्या आजुबाजूच्या माणसांना काही निराळी वाटणार नाही. पण मी फक्त भुवईवरून हात फिरवतोय, ह्याचा एक संदेश होऊ शकेल.

'पण तोच कोणता ?' अन्यानं विचारलं.

'ते मी नाही ठरवलं. आपण ठरवू' रम्या म्हणाला.

'ठीक आहे. पुढे' डीटी उत्सुकतेनं रम्याला विचारीत होता.

'नंतर हे बघा. मी कानाची पाळी मुद्दाम माझ्या हाताच्या बोटांनी कुरवाळतोय...

'त्यापेक्षा पमीचं नाक कुरवाळणं बरं...'

'दादिटल्या.. गप्प बस हं...'

अन्या–पमीचा वाद, एकमेकांना जिभा दाखवून वेडावणं, या गोष्टी आटोपल्यानंतर रम्या पुढे सांगू लागला–

'हे पहा, कानाची पाळी कुरवाळायची सवय आपल्या कोणाला नाही. तेव्हा आपण तसं करणं हा एक संदेश होऊ शकेल. काय डीटी ?'

'पुढे बोल' डीटीला रम्याचं अतिशय कौतुक वाटत होतं. अगदी साऱ्या हालचालीतून गुप्त संदेश देण्याची त्याची कल्पना धमाल होती. रम्या पुढे बोलू लागला –

'तिसरी क्रिया... ही पहा' असं म्हणून त्याने आपले दोन्ही हात एकमेकावर घासले.

'हॅं! हे कसले संदेश? हे कोणीही ओळखू शकतील' अन्यानं लगेच आपला अभिप्राय दिला.

'हो बाई! मलाही तसंच वाटतं. आता मी जर दुसऱ्याच्या देखत मुद्दाम हात घासायला लागले तर तो ओळखेलच की. काय डीटी?'

'नाही पमे... रम्यानं अफलातून डोकं लढवलंय... हे बघा' त्या तीनही हालचाली कोणालाही कळणार नाहीत अशा तऱ्हेनं डीटीनं सगळ्यांपुढे करून दाखवल्या तेव्हा रम्यालासुद्धा आश्चर्याचा धक्का बसला.

डीटी पुढे म्हणाला –

'आता यातून कोणते संदेश द्यायचे ते आपण ठरवू?.... पहिली हालचाल भुवईवरून हात फिरवणं... काय ठरवायचं?'

'मी सांगू?' पमीनं विचारलं.

'सांग की –'

'बघ हं. आपलं डोकं दुखायला लागलं की आपण कपाळावर हात नेतो. तेव्हा आपण दुःखी आहोत... हे सांगायला ही हालचाल वापरावी.'

'व्हेरी गुड... तेव्हा... मित्रहो... त्रास होतोय... दुःख होतंय... हे सांगण्यासाठी आपण भुवईवरून बोटं फिरवावीत. आणि आपण

लक्ष देऊन ऐकतो आहोत... यासाठी कानाच्या पातळीवरून बोटं फिरवावीत' डीटीचं वाक्य पुरं व्हायच्या आत अन्या म्हणाला.

'आणि आम्ही मारामारीला तयार आहोत यासाठी हातावर हात घासावेत.'




सगळ्यांना ही कल्पना पटली. डीटीनं एकेका शब्दानं या हाल-चालीचं वर्णन केलं. भुवईवरून बोटं फिरवणं म्हणजे **वेदना**, कानाच्या पाळीवरून बोटं फिरवणं म्हणजे **जागरूकता** आणि हातावर हात घासणं म्हणजे **आव्हान**.

सगळ्या कंपूला या कल्पना इतक्या आवडल्या की सगळेजण काही न बोलता एकमेकांना या खुणा करू लागले. पमी तर खाणाखुणा करता करता हसत होती. नेहमीच्या सवयीप्रमाणे ती मध्येच नाक गोंजारी तेव्हा बाकीचे हसत. रहस्यशोधाची काम-गिरी नसली तरी या अशाही कल्पना मजेशीर असतात असं सगळ्यांना वाटलं.

• •

पण पमीच्या घरात याच खाणाखुणांचा अतिरेक व्हायला लागला. पमी सारखी अन्याला बजावीत होती की या खुणा गुप्त आहेत, त्या घरात सारख्या तू करू नकोस; तरी अन्या तिचं काही एक ऐकत नव्हता. घरातल्या साध्या गोष्टींसाठी तो या खुणा

वापरीत होता. उदा. सकाळी अंघोळीसाठी दोघे जण एकदम बाथरूमध्ये आले तेव्हा पमीनं आईला हाका मारल्या. आईच्या देखत अन्या सारखा हातावर हात घासू लागला. पमीनं हा विषय सभेत डीटीसमोर मांडला तेव्हा अन्याला फार राग आला.

यावर काहीच न बोलता डीटीने एक नवीनच कल्पना मांडली. तो म्हणाला,

'आपण किल्ल्यावर सहलीला जाऊ या...'

किल्ल्यावर जायचं म्हटल्यावर सगळी भांडणं मिटली. रामनगर गावापासून चार मैलांवरच एक पडका किल्ला होता. या किल्ल्यात तसं प्रेक्षणीय काही नसलं तरी किल्ल्याच्या तटावरून दिसणारी खाडी आणि खाडीत दूरवर असलेला दीपस्तंभ या गोष्टींसाठी सहलप्रेमी माणसं शनिवार-रविवार त्या किल्ल्यात जात असत. मात्र काही महिन्यांपूर्वी त्या किल्ल्याचा एक तट कोसळून मोठा अपघात झाला होता तेव्हापासून त्या किल्ल्यावर जाणं बऱ्याच जणांनी बंद केलं होतं. त्यामुळे आत्तासुद्धा पमी डीटीला म्हणाली,

'डीटी, पण कोणत्याही तटावर जायचं नाही हं नाहीतर माझी आई मुळीच पाठवणार नाही मला.'

'तू चल तर खरं. किल्ल्यावर गेल्यावर ठरवू...' डीटी म्हणाला.

किल्ल्यावरच्या सहलीची सगळी व्यवस्था डीटीनं अन्यावर सोपविली होती. त्यामुळे अन्याचा भाव एकदम वधारला. तो सारखा पमीला ऑर्डरी सोडू लागला.

किल्ल्यावर जाण्यासाठी तयार झालेला डीटी अन्याकडे निघाला. अन्याच्या आईनं आपल्याला कशाला भेटायला बोलावलय याचा त्याला अंदाज बांधता येईना. कदाचित अन्या आणि पमी दोघं भांडणार नसली तर मी तुझ्याबरोबर त्यांना किल्ल्यावर पाठवीन असं त्यांना सांगायचं असेल असं त्याला वाटलं.

'सुयश'च्या दरवाजात सगळीच मंडळी डीटीच्या स्वागताला उभी होती. पमीच्या आईनं हसतमुखानं त्याचं स्वागत केलं आणि घरात आल्यावर तिनं डीटीला सांगितलं –

'हे बघ दिनेश.. तू तुझ्याबरोबर नेहमी अन्याला घेत जा. अरे तुझ्या संगतीत आल्यापासून तो खूप बदललाय. रोज डायरी काय लिहितो, पुस्तकं वाचतो! अजून पमीशी भांडणं करायचं बंद होत नाही पण होईल. तेव्हा त्याला सोडू नकोस.'

डीटीचा जीव भांड्यात पडला: पमीच्या आईनं या छोट्या सहलीसाठी खूप खायला प्यायला दिलं होतं. ते सगळं घेऊन तिघंजण रम्याकडे निघणार तोच रम्याच तिथे हजर झाला.

'काय रे?' डीटीनं विचारलं.

'काही नाही. लवकर तयार झालो, म्हटलं अन्याकडे जावं म्हणून आलो.' रम्या म्हणाला.

चौघेजणं किल्यावर जायला निघाले. वाटेतच रम्याला दुर्बिणीची आठवण झाली. त्याने डीटीला विचारलं. डीटीने पिशवीवर हात मारून दुर्बिण कुठे आहे तेच दाखवलं.

• •

किल्ल्यात गेल्यावर सगळ्यांना कुठे जावं न कुठे नाही असं झालं होतं. कारण किल्ला कसा पहावा हे डीटीनं त्यांना सांगितलं होतं.

त्यामुळे इतके वेळा याच किल्ल्यावर येऊन सुद्धा... पागेची जागा, तळघरं, भुयारी रस्ते, तटबंदी, तोफांच्या जागा, गवाक्षे ही ठिकाणे त्यांना माहित नव्हती. पमी तर सारखी डीटीला कायरे इथे शिवाजी महाराज आले असतील का रे असे विचारीत होती.

नेहमीच्या सहलीप्रमाणे कोणीही ओरडणारे शिक्षक किंवा पालक या सहलीत नसल्यामुळे चारी मुलं मुक्तपणे हिंडत होती. अन्या सहलीचा लीडर झाला होता त्यामुळे त्याच्या अंगात हिरो शिरला होता. एखाद्या संशोधकानं किल्ल्याची तपासणी करावी तसा तो प्रत्येक भिंत पहात होता. पमी डीटीला धरून होती. सारखी वटवट करून तीं डीटीला काहीतरी विचारीत होती तर रम्या आपल्या वहीत दूरवर दिसणाऱ्या दीपस्तंभाचं चित्र काढीत होता.

'डीटी या किल्ल्यात किती रहस्यं लपली असतील नाही ?' पमीनं डीटीला विचारलं.

'ती सगळी रहस्य इतिहासजमा झाली पमे.'

'म्हणजे ?'

'म्हणजे संपली. आता इथे काही उरलं नाही.'

'ए, इथे एखादं रहस्य मिळालं तर काय धमाल होईल नाही !'

'पमे रहस्यं अशी फुलांसारखी झाडावरून पडत नसतात' डीटी म्हणाला.

'मग त्याशिवाय का त्या इटलीच्या नारडोननं सहा महिन्यात हजार रहस्यं शोधली. म्हणजे रोज कमीतकमी दहा तरी रहस्यं झाली... ' पमीचं वाक्य संपायच्या आत अन्या तिथं धापा टाकीत आला. त्याच्या चेहऱ्यावरून त्यानं काहीतरी भयंकर पाहिल्याचं दिसत होतं.

□ □ □

...२

# ३. घटनेचा मागोवा

सगळीजणं अन्याच्या भोवती जमली होती. अन्यानं जे काही पाहिलं ते सांगायला सुरुवात केली. किल्ल्याच्या तटाचा जो भाग काही महिन्यापूर्वी कोसळला होता त्या भागातच अन्या फिरत होता. कोसळलेल्या दगडांवरून वर चढताना त्याला मजा वाटत होती. त्याहीपेक्षा असल्या अडचणीच्या जागेतून जाताना कोणी त्याला बोलणारं मागे नव्हतं यातच तो खूष होता. त्यामुळे मुद्दामच कठीण आणि पडक्या वाटेने तो तटावर चढू लागला. चढता चढता एका ठिकाणी त्याला एक गुहेसारखी जागा दिसली. तिथे दिवसाउजेडी इतका काळोख होता की आतलं काही दिसत नव्हतं. गुहेच्या तोंडाशी बरीच काटेरी झुडपं होती. अन्या दम घेण्यासाठी या ठिकाणी उभा राहिला असता त्याला एक विलक्षण घटना दिसली. त्या गुहेच्या आतल्या बाजूस एक लहानशी फट दिसत होती, आणि त्या फटीतून अन्याला एका माणसाचा चेहरा दिसला. अन्या त्या माणसाला पाहून भयंकर घाबरला आणि तिथून तो जीव घेऊन जो पळत सुटला तो थेट डीटी जिथे बसला होता तिथे पोहोचला. अन्याने सांगितलेली बातमी ऐकून डीटी चकीत झाला. त्याने त्या पडक्या तटाकडे पाहिलं पण त्या ठिकाणी आतमध्ये माणूस दिसण्याची शक्यता असेल असं त्याला वाटलं नाही.

'चला आपण पाहू' असं म्हणून डीटी उठणार तोच पमीनं त्याच्या हाताला घट्ट धरून ठेवलं आणि म्हणाली,

'नको डीटी...आपण घरी जाऊ'

'होय डीटी, आपण घरी जाऊ या.' अन्या खरंच घाबरला होता.

'ठीक आहे. आपण तिकडे जायचं नाही. इथेच बसू या.' असं म्हणून डीटी तिथेच बसला. रम्या, अन्या आणि पमीही डीटी-बरोबर खाली बसली. पण डीटीखेरीज तिघांचं लक्ष सारखं त्या पडलेल्या तटाकडे जात होतं. त्यामुळे डबे सोडून सगळ्यांनी खायला सुरुवात केली तरी कोणी बोलायला तयार नव्हतं. शेवटी डीटीनं शेरलॉक होम्सची गोष्ट सांगायला सुरुवात केली.

ठरल्या वेळेपेक्षा लवकरच सहल घरी परतली. पमीच्या चेहऱ्यावर अजून भीतीचं जाळं होतंच. सगळेजण घरी जाण्यापूर्वी अन्यानं जे पाहिलं त्याबद्दल कोणीही कुठे बोलायचं नाही असं ठरलं. शाळेच्या नाक्यावरून प्रत्येकजण आपापल्या घराच्या रस्त्यावर जाणार तोच डीटी ओरडला.

'अरे हो .. सगळ्यांनी लक्षात ठेवा. उद्या माझा वाढदिवस आहे, तेव्हा सगळ्यांनी संध्याकाळी घरी यायचं. समजलं !'

डीटी निघून गेल्यावर रम्या, अन्या आणि पमी तिघांची रस्त्यातच सभा भरली. डीटीच्या वाढदिवसाला त्याला काय भेट द्यावी हे आताच ठरवून टाका असं पमीनं सांगितल्यामुळे अन्याने रम्याला थांबायला सांगितले होते.

'काय द्यायचं आपण ? तो बडा आहे.' पमी.

'बडा असला म्हणून काय झालं ? आपल्याजवळ असेल ते देऊ.' रम्या.

'त्याला आपण कॅडबरी देऊ या' पमी.

'नको. कॅडबरी काय !' अन्या म्हणाला. शेवटी काहीच न ठरवता रम्या आपल्या घरी व पमी व अन्या आपल्या घरी परतले.

डीटीच्या घरी ममींनी डीटीचा वाढदिवस मोठ्या प्रमाणातच साजरा करायचा ठरविला होता. कारण रामनगरला आल्यापासून त्यांच्या घरात एकही कार्य झालं नव्हतं, त्यामुळे या निमित्ताने ओळखीच्या माणसांना बोलावता येईल असा विचार करून हा डीटीचा वाढदिवस मोठ्या प्रमाणात करण्याचं ठरवलं.

सगळ्या अंगणात टेबल खुर्च्या मांडल्या होत्या. एका झाडावर विजेच्या दिव्यांची रोषणाई केली होती. एका ठिकाणी टेपरेकॉर्डर होता. त्यातून सनईचे सूर ऐकू येत होते. संध्याकाळच्या वेळेला हळूहळू माणसं जमायला लागली. डीटीनं नवीन सूट घातला होता. टाय–बूट आणि सूट यामुळे डीटी एखाद्या राजकुमारासारखा दिसत होता. त्याच्या ममींनी त्याला ओवाळलं आणि कपाळावर केशराचा टिळा लावला. डीटीनं आईवडिलांना आणि जमलेल्या मोठ्या मंडळींना नमस्कार केला. प्रत्येकजण त्याचं अभिनंदन करीत होता.

आलेल्या मंडळींना आइस्क्रीम देण्यात आलं. अत्तर लावण्यात येऊन गुलाबपाणी शिंपडण्यात आलं. प्रत्येक माणूस डीटीजवळ येऊन वाढदिवसाची भेट देत होता. या सगळ्या प्रकारात डीटीचं लक्ष मात्र सारखं दरवाज्याकडे होतं. तो आपल्या कंपूची वाट पाहात होता. आइस्क्रीमची एक बशी घेऊन ममी डीटीजवळ आल्या तरी त्याचं लक्ष त्यांच्याकडे नव्हतं.

'काय झालं तुला दिनू ?' ममींनं विचारलं.

ममींना उत्तर द्यायच्या आधीच डीटी तिथून पळत सुटला आणि दरवाजाजवळ आला. तिथे बाहेरच तिघेजण घुटमळत होते. तिघांनी चांगले कपडे घातले होते. पमी तर बाहुली दिसत होती....

तरीपण डीटीच्या घरचा तो मोठा समारंभ पाहून तिघं बाहेरच उभी राहिली. डीटी त्यांच्याजवळ गेला आणि त्यांना घेऊन तो आत आला. एवढा मोठा डीटीचा वाढदिवसाचा समारंभ ! पमी मनांत म्हणाली. डीटीनं त्या तिघांना स्वतः आइस्क्रीम दिलं आणि त्यांच्याबरोबर स्वतः खाऊ लागला.

आइस्क्रीम खाऊन झाल्यावर रम्यानं डीटीला एका रंगीत कागदात बांधलेलं एक पुस्तक भेट दिलं. पमीनं एक खोका दिला आणि अन्यानं एक पाकिट दिलं... तेवढ्यात डीटी घरात गेला आणि घरातून मिठाईचे तीन बॉक्सेस आणून त्यानं त्या तिघांना दिले... नंतर पपा आणि ममींशी आपल्या तिघा सहकाऱ्यांची ओळख करून दिली. पपांना पमीचं विशेष कौतुक वाटलं. त्यांनी पमीला इंग्रजीतून नाव विचारल्यावर पमीनं धाडधाड उत्तर दिलं—

My name is Pramila Mahadeo Kulkarni.
I am in seventh standard. I stay in ‘suyash’
Road No. twelve, Ramnagar. Post Ramnagar.

पमीचं हे उत्तर ऐकून जमलेले सगळे हसायला लागले. पपा तिच्या पाठीवर थाप मारणार तोच त्यांचं लक्ष बाहेर गेलं आणि तिथूनच ते ‘या इन्स्पेक्टर जगताप’ असं म्हणत पुढे झाले. इन्स्पेक्टर जगताप हे नाव ऐकल्याबरोबर सगळ्या कंपूचे डोळे दरवाज्याकडे लागले... पपा त्यांना घेऊनच आत आले.

पमीला उगीचच त्यांच्याशी केलेल्या शेकहँडची आठवण झाली. आत आल्याबरोबर इन्स्पेक्टरसाहेबांनी प्रथम या कंपूशीच बोलायला सुरवात केली. या कंपूबरोबर त्यांनी आइस्क्रीम खायला सुरवात केली. बोलता बोलता ते पमीजवळच बसले. इतकंच नाही

तर पमीला आपल्या जवळ घेतलं. त्यांच्या त्या प्रचंड शरीराजवळ पमी एखाद्या वाघाजवळ बसलेल्या सशासारखी दिसत होती.

पपा, इन्स्पेक्टर जगताप आणि कंपू यांच्या बऱ्याच गप्पा झाल्या. पपांनी सहज जगतापांना विचारलं,

'आज तुम्ही रामनगरला होतात हे नवलं ! मला अपेक्षा नव्हती.'

त्यावर जगताप म्हणाले –

' इथे एक स्पेशल काम निघालय– किल्ल्यावर.'

किल्ल्यावर हा शब्द ऐकल्यावर डीटी एकदम दचकला. त्यामुळे त्याच्या बशीतला चमचा एकदम उडाला तो जगतापांनी वरच्या-वर झेलला तेव्हा सगळ्यांनाच हसू आलं.

' मग आता तुम्ही इथेच राहणार ? डीटीनं विचारलं.

' नाही रे. मी जाऊन येऊन राहीनं.'

' त्या मामाचं काय झालं ?' पमीनं विचारलं.

' कोण तो जोशीबाईंचे देव चोरणारा ! तो फोडतोय खडी. चांगली शिक्षा झाली त्याला.' इन्स्पेक्टर हसत म्हणाले.

सगळा कार्यक्रम संपला. सगळेजण घरी गेले. डीटी मात्र जगतापांच्या त्या वाक्याचाच विचार करीत होता. केव्हा एकदा आपण आपल्या कंपूची सभा घेतो आणि सभेपुढे हा विषय मांडतो असं त्याला झालं. त्या विचारानं त्याला झोप लागत नव्हती.

गुप्तमंजुषेत डिटेक्टिव्ह डीटी आणि कंपूचे सगळे सभासद जमले होते. रोजच्या गंमतीच्या आणि हसण्या-खिदळण्याच्या वातावरणापेक्षा आजचं वातावरण निराळं होतं. आल्याबरोबर पमी डीटीला म्हणाली –

'डीटी, इन्स्पेक्टरसाहेब काय म्हणाले ऐकलस का ?'

जे डीटी सगळ्यांना सांगणार होता तेच पमीनं त्याला विचारलं आणि लगेच रम्याही तेच म्हणाला, इतकंच नव्हे तर अन्यानं इन्स्पेक्टर जगतापांची सही सही नक्कल करून तेच वाक्य उच्चारलं तेव्हा सगळ्यांच्या लक्षात ती गोष्ट आल्याचं डीटीला समजलं, त्यामुळे जास्त प्रस्तावना न होता एकदम सभेला सुरुवात झाली.

'मला बाई यात रहस्य वाटतय' पमी.

'अहो बाई, पण तुम्ही तेव्हा किती घाबरला होता ते आठवतय का ? घरी चला, घरी चला कोण म्हणालं ?' अन्या म्हणाला.

'मग तेव्हा मला भीति वाटली.'

'पण आता इन्स्पेक्टर जगताप पण आहेत इथे' रम्या म्हणाला.

'काय करायचं डीटी ?' अन्यानं विचारलं.

'पुन्हा किल्ल्यावर जायला हवं' डीटी विचार करून म्हणाला.

'जाऊ या' अन्या तयार झाला.

'पण या वेळेला आपल्याला लगेच परतता यायचं नाही. कदाचित संध्याकाळ होईपर्यंत म्हणजे काळोख होईपर्यंत थांबावं लागेल' डीटी म्हणाला.

'मग आपण पमीला न घेता जाऊ,' अन्यानं पमीला चिडवीत सांगितलं.

झालं, पमीचं न् त्याचं वेडावणं सुरू झालं.

ते थांबवून डीटी म्हणाला –

'पमे, संध्याकाळी थांबायचं ठरलं तर तुला आधी घरी यावं लागेल. कारण आम्ही काहीतरी कारण सांगून बाहेर राहू पण तुला राहता यायचं नाही. समजलं ?'

'पण संध्याकाळी राहायलाच हवं ?'

'हो ना. या अशा हालचाली काळोखातच होतात. तेव्हा कदाचित बराच वेळ थांबावं लागेल.' डीटीनं पमीला समजावून सांगितलं.

यानंतर डीटीनं एक योजना आखली. योजनेला नाव दिलं '**किल्ल्यातलं गुपीत.**' या गुपीतासाठी सगळ्यांनी किल्ल्यावर जायचं. जाताना बरोबर टॉर्च, चाकू, दोरी, कागद, पेन्सिल आणि काही पैसे न्यायचे ठरले. जर संध्याकाळच्या आत काही सापडलं नाही आणि बराच वेळ थांबायची वेळ आली तर अन्यानं पमीला सायकलवरून घरी पोचवावी आणि डीटी व रम्याच्या घरी उशीर होईल असे निरोप द्यावे असं ठरलं. जास्तीत-जास्त रात्री नऊपर्यंत मात्र घरी आलंच पाहिजे हेही ठरलं. कारण उशीरा येण्याचं कारण सगळयांच्या घरी पटेल असंच पाहिजे. शिवाय पूर्व संमतीशिवाय जास्त वेळ राहता येणं शक्य नव्हतं म्हणून 'कदाचित आम्ही संध्याकाळच्या सहाच्या सिनेमाला जाणार आहोत' असं प्रत्येकानं घरी सांगून ठेवायचं असंही ठरलं. वेळ आली तर अन्याला पोचवून रम्याच्या आणि डीटीच्या घरी ते सिनेमाला बसणार आहेत असा निरोप देऊन किल्ल्यावर यायचं ठरलं. या सगळ्या प्रकारात पमी हिरमुसली झाली होती. पण याशिवाय दुसरा उपाय नव्हता हे तिलाही पटलं होतं.

• •

ठरल्याप्रमाणे चौघेजण किल्ल्यावर निघाली. तिथे काय होणार याची कोणालाच कल्पना नव्हती. तरी पण सगळ्यांना भरपूर उत्साह होता. हसत खेळत सगळे किल्ल्यावर आले.

किल्ला होता तसाच होता. मात्र यांच्या नजरेला निराळं वाटत होतं. पमीला तर जागोजागी डाकू नाही तर दरोडेखोर दिसत होते. त्यामुळे किल्ल्यावर चालताना ती डीटीची पाठ सोडत नव्हती. अन्या ज्या दिशेने त्या पडलेल्या तटावर चढून गेला होता त्या ठिकाणी सगळ्यांनी चढायला सुरवात केली. इतक्यात 'ए' असा दमदार आवाज त्यांना ऐकू आला. सगळ्यांनी दचकून मागे पाहिलं तर साळवीसाहेब उभे.

'काय साळवीसाहेब ?' डीटीनं मनातून रागावून पण बाहेर हसत विचारलं.

'काय आहे काय इकडे. चला .. बाहेर व्हा .. किल्ला पडलाय दिसत नाही तुम्हाला ? उतरा ..' साळवींनी भराभर हुकूम सोडले. सगळेजण डीटीकडे पाहू लागले. डीटीनं आपल्या भुवईवरून हात फिरावयाला सुरवात केली.

सगळे खाली उतरले. ते नजरेआड होईपर्यंत साळवी तिथे उभे होते.

किल्ला संपून रस्त्यावर आल्यावरसुद्धा काही न बोलता चौघे-जण रामनगरला परत निघाले.

वास्तविक काहीही काम न होता परतायचं डीटीच्या जीवावर आलं होतं.

□ □ □

# ४. डीटीचं धाडस

दुसऱ्या दिवशी सकाळीच डीटी आपली सायकल घेऊन घराबाहेर पडला. काही कारण नव्हतं तरी तो अस्वस्थ झाला होता...सारखा त्याच्या डोळ्यासमोर किल्ला दिसत होता. आपण एकटच आता किल्ल्यावर जावं असे त्याला वाटत होते...पण तसं करण्यात काही शहाणपणा नव्हता हे ते जाणून होता. एकदा सगळ्यांनी मिळून एखादं काम करावयाचं ठरल्यावर आपण एकट्यानच निराळा शहाणपण करणं ठीक नाही हे तो समजून होता. त्यामुळे वैतागून तो सायकलीवरून चालला होता. चालवता चालवता त्याने दोन्ही हात सोडून दिले.. दोन्ही हात सोडून सायकल चालविण्याची त्याला सवयच लागली होती ... त्यामुळे डोक्यातले सगळे विचार बाजूला जाऊन तो सायकलवर कसरत करू लागला...

रस्त्यावरची माणसं आपल्या कसरतीकडे बघताहेत हे पाहून तर त्याला चेवच चढला. समोरून येणाऱ्या माणसाला घाबरून सोडण्यात त्याला मजा वाटत होती. एक गलेलठ्ठबाई तर इतकी घाबरली की डीटीची सायकल चुकविण्याकरता तिने उडीच मारली त्या बाईची उडी नेमकी एका मोटारी समोर पडली. त्या मोटारीच्या ड्रायव्हरने इतक्या जोराने ब्रेक लावले की आतली माणसे एकमेकावर आपटली... जेमतेम ती मोटार त्या बाईच्या पायाशी थांबली. पण त्या मोटारीमागून येणारी एक स्कूटर मात्र चटकन न थांबल्यामुळे धाडकन मोटारीच्या मागच्या भागावर आदळली.

पाच मिनिटांत रस्त्यात धुमाकूळ झाला. हे सगळं आपल्यामुळे झालं हे पाहुन डीटी भयंकर घाबरला. रस्त्यातल्या सगळ्या गर्दीचं

लक्ष आपल्याकडे आहे असे त्याला वाटले. एवढ्यात तो स्कूटर चालविणारा आणि मोटारीचा ड्रायव्हर यांची भांडणे सुरू झाली. त्या गडबडीत डीटी सटकला. पण झालेली गोष्ट त्याच्या मनात खटकत राहिली.

दुसऱ्या रस्त्याला लागल्यावर डीटीने आपला कपाळावरचा घाम पुसला. त्यानें मागे पाहिलं कोणीही त्याच्या मागे नव्हतं. त्याला हायसं वाटलं. मात्र आता तो सायकलवरून उतरला आणि सायकल हातात धरून चालू लागला...थोड्या वेळापूर्वी झालेल्या प्रसंगाच्या वेळी कोणी ओळखीचं नव्हतं हे लक्षात येऊन त्याला फार बरं वाटलं. मात्र आता असे उद्योग करायचे नाहीत असा त्यानं निश्चय केला आणि हा निश्चय कोणाला सांगावा असा तो विचार करीत असतानाच त्याला समोरून पमी येताना दिसली.. पमीला डीटी अचानक दिसल्याचा आनंद झाला.

'कायरे? तू इकडे कुठे?' पमीनं डीटीला विचारलं.

'तू काय करतेस?' डीटीने विचारले.

'अरे बाबांनी पाकीट पोचवायला सांगितलय'.

'कुठे?'

'सरदारनगरात...हा बघ पत्ता' असे म्हणून तिने डीटीला पाकीट दाखविले.

मग चल...मी पोचवतो तुला—माझ्याच घराचा बाजूला... पमीला आनंद झाला. कारण सरदारनगर तिच्या घरापासून दूरच होतं आणि तिला सकाळीच एवढ्या लांब जायचा कंटाळा आला होता.

डीटीने तिला सायकलवर बसवली आणि तिला हव्या त्या पत्त्यावर दोघं गेले.

पमी पाकीट देऊन लगेच परतली. डीटीने तिला आपल्या घरी नेली. आणि मघाशी झालेला सगळा प्रकार आणि आपण केलेला निश्चयही तिला सांगितला. त्यावर पमी म्हणाली–

'नाही डीटी... शिक्षा हवी'

डीटी सर्द झाला... पमी असं काही बोलले असं वाटलं नव्हतं.

'काय शिक्षा ?'

'तू त्या जाडचा बाईची माफी माग...'

डीटी तिला 'हो' म्हणाला पण तिला शोधायची कशी हा प्रश्न पमीला विचारण्याचं धाडस झालं नाही.

• •

गुप्तमंजूषेत डिटेक्टिव्ह डीटी आणि कंपूची सभा सुरू झाली. डीटीने सगळे मुद्दे सभासदांसमोर मांडले आणि म्हणाला, 'काहीही करून आपल्याला किल्यावर जायलाच हवं. कारण साळवीसाहेब किल्यावर दिसले याचा अर्थ पोलिसांनी हालचालीला सुरवात केली असा होतो अन्याने पाहिलेला माणूस पोलिसांना दिसला तर ते पुढे जाणारच. तेव्हा करायचं काय ?'

'आपण जगतापसाहेबांना सांगू ना-' रम्या चड्डी वर खेचीत म्हणाला.

'नको एवढ्यात नको'

'मग साळवींना !'

'त्यांना तर मुळीच नको...'

'मग करायचं काय ?'

'आपण किल्ल्यात रहायचं-'

'रहायचं! डीटी सोडून तिघं किंचाळले.

'मग त्या शिवाय कसं कळणार ?' डीटी म्हणाला.

'पण आम्हाला परवानगी नाही मिळायची' रम्या म्हणाला. अन्याही तेच म्हणाला. त्यावर डीटी म्हणाला-

'मग मी एकटाच जातो'

'नको नको. तू नको जाऊ' पमी म्हणाली.

'माझं ऐक पमे... मी एकटा गेलो तरी मी तुम्हाला सांगून जातो. आणि मला जर माझ्या ताकदीबाहेरचे काम वाटलं तर मी परत येईन. समजलं. तेव्हा मी काय सांगतो ते ऐका' असं म्हणून आपली योजना सांगितली. ती अशी-

आता संध्याकाळी पाच वाजता डीटी किल्ल्यावर जाण्यासाठी निघणार कारण आज त्याच्या घरी कोणी नव्हतं. ममी किंवा पपा दोघं बाहेर गावी गेल्यामुळे रात्रीचाही प्रश्न नव्हता. संध्याकाळी किल्ल्यावर जाऊन काळोख पडेपर्यंत डीटी अन्यानं सांगितलेल्या जागेचं निरीक्षण करणार आणि काळोख पडल्यावर किंवा रात्री कांही महत्त्वाच्या घटना त्याला आढळल्या तर तो रात्री किल्ल्यावर राहून सकाळी परत येणार - उद्या अन्याने सकाळी नऊच्या सुमारास डीटीच्या घरी यावं.... आणि चवकशी करावी.

डीटीची ही योजना सगळ्यांनी मंजूर केली. किल्ल्यावर जाताना डीटीनं टॉर्च, दोरी, चाकू, काठी, पुरेसं पांघरूण, पाण्याची पिशवी सँडविचेच, कॅडबरी या गोष्टी बरोबर न्याव्यात असे ठरलं. हे सगळं

ठरेपर्यंत पाच वाजलेच. सगळ्या वस्तूंची जमवाजमव झाली. आणि डीटी आपल्या मोहिमेस निघाला.

अन्यानं डीटीला सायकलवर डबलसीट घेतलं आणि दोघे किल्ल्याकडे निघाले.

• •

अन्याचा निरोप घेऊन डीटी किल्ल्यात आला. किल्ल्यावर कोणी असेल असं त्याला वाटलं नव्हतं - पण त्याची कल्पना चुकीची होती... दहा पंधरा माणसं किल्ल्यात दिसत होती... पण ही माणसं सहलीसाठी आली असावी हे डीटीने लगेच ओळखलं...त्या सगळ्या माणसांकडे दुर्लक्ष करून डीटी पडलेल्या तटाकडे निघाला. एवढ्या त्याला एका बाईची ओरड ओरड ऐकू आली. ती बाई बचाव बचाव... असं ओरडून एका ठिकाणी बोटं दाखवीत होती.

सहलीतल्याच त्या बाईची मदतीसाठी बाकीची माणसं धावली. डीटीही तिथे गेला... त्यानं पाहिलं तर एक काळा कुळकुळीत साप एका लहान मुलाच्या अगदी जवळ वळवळत होता... सगळी माणसं घाबरली. त्यातल्या काही माणसांनी हातात दगड हातात घेतले पण तिथे दगड मारणंही कठीण होतं. ती बाई तर ओरडून ओरडून सगळ्यांना त्या पोराला वाचवायला सांगत होती... डीटी झटकन पुढे झाला. आणि त्याने आपल्या काठीने त्या सापाला एकदम लांबवर उडवलं. तिथे पडल्याबरोबर साप झुडपात पळाला पण ते लहान मूल वाचले. सगळ्यांनी डीटीचं कौतुक केलं... डीटीलाही आनंद झाला. त्याने आता त्या बाईकडे पाहिलं तर काय आश्चर्य ! तीच गलेलठ्ठ बाई आता त्याच्यासमोर होती आणि ती डीटीचे आभार मानत होती डीटीला बरं वाटलं

• •

हळूहळू काळोख पडायला सुरूवात झाली. सहलीसाठी आलेली ती माणसं परतली. आता किल्ल्यात कोणीच नव्हतं... खाडीच्या पाण्याचा आवाज, आणि हळूहळू पसरणारा काळोख यामुळे एक प्रकारचं गंभीर वातावरण सुरु झालं. डीटी एका दगडावर बसला होता. अन्याने सांगितलेल्या जागीच त्याने एक दगड शोधून ठेवला होता त्या दगडाच्या आजूबाजूला काही जनावर वगैरे नाही याची त्याने खात्री उजेडातच करून घेतली होती. आता त्या दगडावर बसून त्याने सॅंडवीच खायला सुरवात केली.

सॅंडवीच खाऊन झालं पाणी पिऊन झालं... कॅंडबरीचा एक तुकडाही संपला... तरी काहीही दिसलं नाही. डीटीला आता कंटाळा यायला लागला. आता तर काळोखच काळोख झाला होता. थंडगार वारा वाहायला सुरवात झाली होती. एकाच ठिकाणी बराच वेळ बसून राहिल्यामुळें डीटी वैतागला होता...जरा हातपाय हलवावेत असं त्याला वाटलं म्हणून तो उठणार तोच... त्याला काही आवाज ऐकू आले. डीटीने आपले कान टवकारले.

ज्या गुहेच्या ठिकाणी अन्याला एका माणसाचा चेहरा दिसला त्याच ठिकाणाहून काही माणसं बोलत असल्याचे डीटीला ऐकू आलं. तो थोडा पुढे झाला आणि कान देऊन ऐकू लागला.

'अब्दूल ?'

'क्या मालिक ?'

'कितना माल हैं ?'

'दस बाकस'

'वेरीगुड'

- हं.....

'इन्स्पेक्टर जगतापसाब रामनगरमे आये है'

'इन्स्पेक्टर जगताप !' असं म्हणून बोलणाऱ्या दोघापैकी एक जण हसत होता...

ऐकलेल्या संवादावरून डीटीला काहीच बोध होईना. . दस बाकस म्हणजे काय हे त्याला काही कळलं नाही. कदाचित कसले तरी दहा बॉक्सेस असावेत असं त्याला वाटलं. मात्र डीटीला इथे कांही तरी भंयकर रहस्य आहे याची खात्री पटली. त्यामुळे ही बोलणारी माणसं दिसतात का हे पाहण्यासाठी डीटी आणखी पुढे झाला. पण त्याला काहीच दिसलं नाही. आता त्याला कुजबुजणं ऐकू येत होतं- पण बोलणं नीट ऐकू येत नव्हतं आणि बोलणारी माणसंही दिसत नव्हती. त्यामुळे वैतागून त्याने आपल्या हातातला टॉर्च चटकन पेटवला...

इतक्यात त्याला दोन चार शिळा ऐकू आल्या आणि किल्ल्याच्या दुसऱ्या बाजूने दोन तीन प्रखर उजेडाचे झोत दिसले. कोणीतरी टॉर्चेस घेऊन आपल्यालाच शोधायला येत आहे हे त्याच्या लक्षात आलं त्यामुळे तो घाबरला. त्याने टॉर्च बंद केला आणि त्या जागे-वरून पळण्यासाठी तो मागे वळला.

डीटी ज्या जागी बसला होता तिथे तटाची भीत पडली होती. त्यामुळे काळोखात चटकन खाली उतरणं सोपं नव्हतं आणि खाली दोन तीन माणसं हातात टॉर्च घेऊन त्याच्यामागे येत होती.

डीटी भयंकर घाबरला आता आपली या माणसाच्या तावडी-तून सुटका नाही हे त्याच्या लक्षात आलं. तरी सुध्दा जास्तीत जास्त प्रयत्न करायचे असं ठरवून त्याने खाली घसरायला सुरवात केली. आता त्याच्या अंगावर त्या माणसांनी प्रकाश पाडायला सुरवात

केली. त्या प्रकाशात त्याला समोरचा रस्ता दिसत होता. त्या रस्त्याने तो खाली घसरत आला. आता तो सपाट जमिनीवर उतरला.

'पकडो पकडो.' असे दोनचार आवाज ऐकू आले. पण त्याकडे दुर्लक्ष करीत डीटी खाडीच्या दिशेने पळत सुटला.

ती माणसं त्याचा पाठलाग करीत होती. त्यांच्या हातातल्या टॉर्चमुळे रस्ता प्रकाशित झाला होता — आपण नक्की पकडले जाणार हे माहीत असूनसुद्धा डीटी वेड्यासारखा पळत होता... पण त्याचं दुर्दैव त्याच्या आड आलं. एका दगडाला ठेच लागून तो खाली पडला. तेवढ्यात त्याचा पाठलाग करणारी माणसं त्याच्या जवळ आली. डीटीच्या तोंडावर अगदी जवळून प्रकाशझोत पडले. त्याचे डोळे दिपून गेले. डोळ्यावर हात ठेवून तो तसाच पडून राहिला.

'कौन है ?' एक आवाज...

'मैं... मैं...'

'मैं मैं क्या ! इथे काय करत होतास ?'

'काही नाही.'

'काही नाही ! उचला रे त्याला. आणि चला घेऊन...'

दोघातिघा माणसांनी डीटीला धरलं आणि आपल्याबरोबर फरफटत घेऊन जायला सुरवात केली.

□ □ □

...३

# ५. डीटी बेपत्ता

अन्या डीटीला निरोप देऊन रामनगरला परतला तेव्हा शाळेच्या नाक्यावर तिघं उभी होतीच.

'डीटीचं पण कमाल आहे नाही!' रम्या म्हणाला.

'खरंच कमाल. रम्या...मला कल्पना नव्हती.' अन्या.

'पण आपण करायचे काय?' पमीने विचारलं.

'उद्या सकाळपर्यंत वाट पाहू आणि समजा नऊ वाजता ठरल्या-प्रमाणे डीटी भेटला नाही तर मग आपण जगतापसाहेबांना भेटू.' अन्या म्हणाला...सगळ्यांच्या मनात डीटीच्या धाडसाबद्दल कौतुक तशीच त्याच्याबद्दल काळजीही वाटत होती. तिघंजण घरी जाणार तोच पमीला कसलिशी आठवण झाली आणि ती रम्याला म्हणाली,

'रम्या – तू जरा तुझ्या वडिलांना विचार ना!'

'काय विचारू?'

'विचार की डीटीला काही धोका नाही ना?'

'शहाण्ये – त्यांना काय विचारतेस! त्यांना आपण आता विचारलं तर त्यांना सगळं सांगावं नाही का लागणार!' अन्या पमीला म्हणाला –

पमी हिरमुसली झाली. तिच्या मनातून सारखं डीटीला मदत करावसं वाटत होतं. पण ती काय करणार होती! घरी गेल्यावर ती सारखी अन्याला विचारीत होती. अन्या तिला काहीतरी सबब सांगून गप बसवीत होता – पण त्याच्याही मनात

आपण डीटीबरोबर गेलो नाही, त्याला एकट्यालाच पाठवलं, याची खंत वाटत होती.

रम्यासुद्धा घरी अस्वस्थ होता. त्याच्या आईने त्याला विचारलं–

'कायरे काय झालं ? '

तेव्हा रम्यानं सगळी हकिगत आपल्या आईवडिलांना सांगून टाकली आणि आपल्या वडिलांना तो म्हणाला,

'बाबा डीटीचा प्रश्न बघा ना – मला त्याची काळजी वाटते.'

त्याचे बाबा पंचाग काढून बसले. रम्याची आई मात्र रागावली. तिनं आपल्या तोंडाचा पट्टा सुरू केला.

'काहीतरी नसते उद्योग करावयाचे आणि मग बसायचं रडत. शहाण्या तो किल्ल्यावर जाण्यापूर्वीच सांगितलं असतंस तर त्याला मी जाऊन दिलं नसतं. काय हे ! आईबाप घराबाहेर आहेत हे पाहून हे असले उद्योग करायचे ! ...'

रम्याचं लक्ष बाबांकडे होतं. बराच वेळ आपल्या बोटांवर कसला तरी हिशेब करीत ते रम्याला म्हणाले – 'काही समजत नाही.' इतका वेळ रम्या घाबरला नव्हता; पण आपले बाबा निराश झालेले पाहून मात्र तो भयंकर घाबरला.


रात्री त्याच्या डोळ्याला डोळा लागला नाही. त्याच्या स्वप्नात भलभलत्या गोष्टी येत होत्या.

इकडे पमीलाही झोप लागत नव्हती. झोपण्यापूर्वी तिनं देवाला डीटीसाठी प्रार्थना केली...अन्याला मात्र छान झोप लागली होती.

● ●

डीटीला त्या माणसांनी एका खोलीत नेलं. काळोख होता. त्यामुळे आपण कुठून चाललो आहोत हे डीटीला समजत नव्हतं. कारण आता त्या माणसांनी आपले टॉर्च विझवले होते.

जाताना ती माणसं डीटीला फरफटतच नेत होती. त्यांनी डीटीला डीटीच्या शर्टानेच मानेजवळ धरलं होतं. त्यामुळे त्याचा शर्ट खेचला जाऊन त्याला सारखी ओढ लागत होती. तरी काही बोलणं शक्य नव्हतं. बराच वेळ चालत गेल्यानंतर ते सगळे एका खोलीत आले. खोलीत आल्याबरोबर डीटीला धरलेल्या माणसांनी डीटीला अक्षरश: फेकून दिलं. तो कोलमडत एका भितीवर आपटला. खोलीत एक कंदील पेटत होता. त्याची ज्योत इतकी लहान होती की खोलीतल्या माणसांचे चेहरे दिसणं शक्य नव्हतं.



डीटी भिंतीवर आपटल्यामुळे तो तिथेच बेशुद्ध पडला. त्यामुळे बाकीच्या माणसांनी त्याला तिथेच टाकून बाहेरून कुलूप लावून ते निघून गेले.

बऱ्याच वेळानं डीटी शुद्धीवर आला. नेहमीप्रमाणे मऊमऊ गादीवर असण्याऐवजी आपण इथे अंधारात कुठे आहोत याचा त्याला एकदम अंदाज येईना...एवढ्यात त्याचं कपाळ जोरानं ठणकायला लागलं...तेव्हा हळूहळू त्याच्या लक्षात सगळ्या गोष्टी आल्या– तसा तो एकदम उठला. पण एकदम उठल्यावर त्याचं सगळं शरीर दुखायला लागलं... समोर मंद प्रकाश देणारा कंदील जळत होता. आपण पुढे होऊन तो मोठा करावा आणि आपण कुठे आहोत याचा अंदाज घ्यावा असा त्याच्या डोक्यात विचार आला आणि तो पुढे होणार तोच बाहेर माणसांचे आवाज त्याला ऐकू आले. लगेच तो तसाच डोळे मिटून पडून राहिला.

बाहेरचं कुलूप काढून काही माणसं आत आली–

एका माणसाचा घोगरा आवाज त्याला ऐकू आला......

'तो कंदील आण इकडे...कोण आहे बघू दे मला.'... कोणीतरी त्या माणसाला कंदील दिला असावा. कंदिलाची ज्योत मोठी करून तो डीटीजवळ आला. डीटी डोळे मिटून पडला होता. त्याचा चेहरा बघून तो पुन्हा ओरडला.

'कोण हाए बच्चा... !'

'मालूम नहीं.' आपल्या इस्टोरच्या बाहेर लाईट मारला यानं.

हे बोलणारा माणूस मराठी नसावा हे डीटीनं ओळखलं. तो पुढे बोलत होता.

'हम उसकू पकडा और इधर लाया... हिरालाल थे आमच्या-बरोबर. इथेच लाक करून आम्ही तुम्हाला सांगायला आलो.'

'सकाळी बघू याला.'

'समंदर में फेंक दू क्या ?'

'नको... काही संबंधित नसला तर उगीच भानगडी होतील. कोणतरी पैसेवाल्याचा पोऱ्या दिसतोय. त्याला राहू दे इथेच... सकाळी पाहतो मी' असं म्हणून त्या इसमानं डीटीच्या तोंडा-जवळून तो कंदील दूर केला आणि पुन्हा बाहेरून कुलूप घालून तो बाहेर गेला.

डीटी भयंकर घाबरला... त्या इसमाने मेहेरबानी केली म्हणून आपण वाचलो, नाहीतर त्यांनी आपल्याला समुद्रातच टाकलं असतं, या कल्पनेनंच त्याला शहारे आले. आपण उगीचच एकट्यानं किल्ल्यात येण्याचं धाडस केलं. त्याच्या अपेक्षेप्रमाणे आपण तिथे गुहेत कोणीतरी पाहू, त्याची सगळी माहिती जगतापांच्या कानावर घालू आणि त्यांच्या मदतीने या रहस्याचा भेद करू; ऐवढंच काम असावं वाटलं. पण इथे भलतंच घडलं होतं. त्यातून त्याच्या घरी पपा आणि मम्मी दोघंही नव्हती. त्यामुळे त्यांना ही बातमी समजणार नाही हे खरं असलं तरी त्यांना समजलं असतं तर त्यांनी जग-तापांना सांगून आपल्या सुटकेसाठी आकाश-पाताळ एक केलं असतं, असं त्याला वाटलं. या सगळ्या विचारानं तो अस्वस्थ झाला...... आता इथे मदतीसाठी ओरडावं असंही त्याला वाटलं. पण आधीच किल्ला गावापासून दूर... त्यात खाडीजवळ कुठेतरी ही खोली असणार. तेव्हा आपण ओरडून काही उपयोग होणार नाही याची त्याला जाणीव झाली थोडा वेळ शांत राहिल्यानंतर त्याने आपल्या

मनाशी काही योजना आखल्या. प्रथम त्याने खोलीचं निरीक्षण सुरू केलं....कुठल्यातरी जुनाट वाड्याची ही खोली असावी. या खोलीला एकच दार होतं. खिडकी अशी नव्हतीच...खोलीत काही किरकोळ सामान पडलं होतं. डीटीनं एकेक सामान तपासायला सुरवात केली... एका टेबलाच्या खणात त्याला काही कागद सापडले. त्या कागदावर लिहिलेलं त्याला समजत नव्हतं. पण काही तारखा होत्या... पुढच्या महिन्यातल्या तीन-चार तारखांची नोंद होती... त्याने त्या तारखा लक्षात ठेवल्या. आणि दुसऱ्या गोष्टीच्या निरीक्षणास सुरवात केली.

• •

साळवीसाहेब सकाळी सकाळीच भयंकर वैतागले होते. त्यांच्या वैतागण्याचं कारणही मजेशीर होतं. त्यांच्या लेंग्याची नाडी तुटली होती आणि तुटलेली नाडी–लेंग्याच्या शिवणपट्टीत अशी अडकून बसली होती की त्यांना निघता निघेना. मोजून आठ वेळा त्यांनी त्या आतल्या नाडीचं टोक बाहेर काढण्याचा प्रयत्न केला तरी ती बाहेर येईना. शेवटी एका हातानं पायजमा धरून दुसऱ्या हातानं त्यांनी आपल्या खोलीचं दार उघडून 'म्हाद्या' अशी हाक मारली. महादू पळत आला. साळवीसाहेबांनी त्याला नाडीचं टोक काढा-यास सांगितलं... महादू एक बारा वर्षांचा त्यांच्या घरी काम करणारा पोरगा होता. त्यानं आपली करंगळी साळवीसाहेबांच्या लेंग्याच्या शिवणपट्टीत घालून नाडी बाहेर काढण्याचा प्रयत्न सुरू केल्यावर साळवीसाहेबांना गुदगुल्या होऊन ते हसू लागले. ते हसायला लागल्यावर हलायला लागले. हलल्यामुळे महादूची नाडीजवळ पोचलेली करंगळी पुन्हा बाहेर आली. त्यामुळे त्याचे

सगळे प्रयत्न फुकट गेलेच, शिवाय वरती साळवीसाहेबांच्या शिव्या खाव्या लागल्या.

शेवटी एकदा लेंग्यात नाडी घालायचं काम संपलं. आणि साळवीसाहेबांनी सुटकेचा निश्वास सोडला. आज त्यांनी रजा घेतली होती. त्यामुळे आजचा विश्रांतीचा दिवस अगदी आरामात घालवायचा त्यांनी ठरवलं.. पण ही विश्रांती त्यांच्या नशिबात नव्हती. इन्स्पेक्टर जगतापसाहेबांकडून त्यांना अर्जंट निरोप आला होता. त्याप्रमाणे कोणतीही सबब न सांगता पोलिस - चौकीत हजर राहणे त्यांना भाग होतं या सगळ्या प्रकाराचा राग त्यांनी महादूवर— त्याला शिव्या देऊन - काढला. महादूलाही या गोष्टींची सवय झाली होती. साळवीसाहेबांचं रागावणं झाल्यावर तो शांतपणे हसला.

• •

साळवीसाहेब पोलिस-चौकीत पोहोचले. इन्स्पेक्टर जगताप तिथे होतेच. त्यांना सलामी ठोकून साळवीसाहेब आत आले. इन्स्पेक्टर जगताप त्यांची वाट पाहात होतेच. साळवींना पाहिल्याबरोबर त्यांनी हुकूम सोडायला सुरुवात केली.

'हे पहा साळवी, अर्जंट काम आहे. मुंबईहून खास संदेश आले आहेत की, काही स्मगलर्स तिथून पळून या बाजूस आले आहेत. विशेषकरून खाडीच्या बाजूला ते आपलं बस्थान बसवू पाहात आहेत, तरी लक्ष ठेवून त्यांना पकडायचं ! समजलं !'

साळवीसाहेबांची मान होकारार्थी हलली.

'तुम्ही किल्ल्यामध्ये पाहिलंत ?'

'पाहिलं साहेब. किल्ल्यात लपण्यासारखी एकही जागा नाही. मी त्या किल्ल्याचा कोपरा न् कोपरा शोधला. काही सापडलं नाही...'

'आणि खाडीच्या किनारी ?'

'आज पाहतो.'

'जा – अर्जंट काम करा... ही पहा त्यांची नावं...हे त्यांचे फोटो. ही माणसं सरकारला हवी आहेत. समजलं ? काय वाटेल ते करा पण या स्मगलर्सना पकडा !'

मनातून रागावलेल्या साळवीसाहेबांनी जगतापसाहेबांना आश्वासन दिलं.

इन्स्पेक्टर जगताप जीपमधून निघून गेले...ते गेल्याबरोबर साळवीसाहेबांनी आरडाओरडीला सुरवात केली...आणि इन्स्पेक्टर-साहेबांवरचा राग आपल्या हाताखालच्या माणसांवर काढला.

• •

सकाळी उठल्यापासून पमी अस्वस्थ होती. ती सारखी अन्याला खाणाखुणा करीत होती. अन्यासुद्धा तिला मी जातोय – तू काळजी करू नकोस– असं सांगत होता. पण या सगळ्या खाणाखुणा पमीच्या आईच्या लक्षात आल्या होत्या. तिनं पमीला विचारलं,

'काय ग पमे, काय गडबड आहे ?'

'काही नाही.'

'मग तुमच्या खाणाखुणा कसल्या चालल्या आहेत ?'

'काही नाही ममी...आम्ही मुक्या माणसांची भाषा शिकतो आहोत.' अन्याला ममीच्या पुढे मुक्या माणसाच्या खाणाखुणा करून दाखवल्या. त्यामुळे ममीला हसायला आलं.

नवाला पाच मिनिटे बाकी होती. काहीतरी कारण काढून अन्या डीटीकडे निघाला. पमीला त्याच्याबरोबर जायचं होतं, पण ती जाऊ शकली नाही. अन्या गेला.

साडेनऊ झाले. अन्याचा पत्ता नव्हता. पमीची छाती धडधडू लागली. ती घराबाहेर आली. दूरवरच रम्या आणि अन्या दोघं दिसत होते– मात्र डीटी दिसत नव्हता... पमी पळत सुटली. धावतच ती अन्याजवळ आली– तिने अन्याला काही विचारायच्या आत अन्याच तिला म्हणाला– पमे डीटीचा पत्ता नाही.

□ □ □

# ६. शोध चालू-

डीटीचा पत्ता नाही असं समजल्याबरोबर तिघांनी सभा घ्यायची ठरविली. अर्थात ही सभा गुप्तमंजुषेत (म्हणजे डीटीच्या घरी) होणं शक्य नव्हतं. रम्याच्या घरीही होणं शक्य नव्हतं. त्यामुळे पमीच्या घरी म्हणजे सुयशमध्ये सभा घ्यायची ठरलं.... तिघं लगेच घरात आलेच. पमीच्या आईला कसलाही संशय येऊ नये म्हणून त्यांनी अन्याच्या खोलीत कॅरम खेळायला सुरवात केली.

कॅरम खेळता खेळता एकीकडे सभा सुरू झाली.

'आता आपण काय करायचं अन्या?' रम्या विचारीत होता.

'त्याच्या आधी आपण डीटीचे काय झालं असेल याची शक्यता तपासून पाहू.' असे अन्या म्हणाला.

'डीटी घाबरला तर नसेल!' रम्याची शंका

'एखादं भूतबीत नसेल ना!' पमीची शंका. तिला भुताखेतांची भारी भीती वाटे. आणि कोणीतरी तिची मैत्रिण तिला किल्ल्यात भूतं आहेत असं कालच म्हणाली होती.

'भूतं नाही ग – काहीतरी विचार करू नकोस.' अन्या.

'मला वाटतं अन्या तुला जो माणूस दिसला तोच डीटीनं पाहिला असावा आणि त्याचा शोध लावण्याकरिता डीटी त्याच्या मागे गेला असावा.' रम्या आपली चड्डी वर खेचीत म्हणाला.

ती शक्यता पमीने खोडून काढली. ती म्हणाली–

'हे शक्यच नाही. डीटी शिस्त मोडणार नाही. त्याला येणं अशक्यच असेल म्हणून तो घरी आला नाही. नाही तर तो नवाला हजर झालाच असता.'

'पण म्हणजे तो गेला कुठे ?' रम्या.

'तो अडकला असेल.' पमी.

'त्या माणसांनी त्याला कोंडून ठेवलं असेल.' अन्या.

'कोंडून !' पमी किंचाळली...

'मग ती मंडळी जर चोर किंवा डाकू असतील तर त्यांना डीटीनं पाहिलेलं कसं आवडणार !'

'पण कोंडून त्याला मारणार नाही ना !'

'मारतीलही.'

इतक्यात पमीची आई बाहेर आली तसा तिघांनी विषय बदलला. पुन्हा कॅरमबद्दल ती तिघं बोलू लागली– वास्तविक कोणीही खेळत नव्हतं– पण आईसमोर खेळण्याचा अभिनय करणं तिघांना भाग होतं. आई पुन्हा घरात निघून गेल्यावर पहिल्या विषयास सुरवात झाली.

'पण आता करायचं काय ?' पमीनं विचारलं.

'हे बघा, आता मी जातो.' अन्या म्हणाला.

'तू ? आणि ?' पमीने विचारलं

'मी जाऊन काही शोध लागतो का ते पाहतो आणि संध्याकाळी पुन्हा आपण सभा घेऊ त्यात सगळी माहिती देतो.' अन्या म्हणाला. पमीच्या मते रम्यानंही जावे असं होतं; पण आपण ही गोष्ट घरी सांगितल्यामुळे आपली आई आपल्याला किल्ल्यावर पाठवणार नाही

याची रम्याला खात्री होती. त्यामुळे अन्यानं एकट्यानं किल्ल्यावर जावं असं ठरलं. त्यासाठी त्याला आवश्यक ती मदत करायची सर्वांनी ठरवलं. अन्या लगेच निघालाही. त्याचा जाण्याचा आईला संशय येऊ नये म्हणून निघण्यापूर्वी रम्यानं अन्याला आपल्या घरी जेवायला बोलावलं. अन्याच्या आईनंही काही संशय न घेता संमती दिली.

दोन्ही सायकली सुयशच्या बाहेर पडल्या. त्यापूर्वी पमीनं अन्याला बजावलं होतं–

'दादा तू जास्त पुढे जाऊ नकोस हं. काही कळलं तर लगेच परत ये. नाहीतर तुझी काळजी लागायची'

पमीला धीर देऊन अन्या निघाला.

• •

किल्ल्यापर्यंत सायकल चालवताना अन्याच्या डोक्यात असंख्य विचार थैमान घालत होते. त्याच्याच कल्पनेप्रमाणे डीटीला गुंडांनी अगर चोरांनी पकडून – कोंडून ठेवलं असलं तर तो तरी काय करणार होता ! आपण घरी परत जावं आणि डीटीला द्यावं त्याच्या नशिबावर सोडून असाही विचार त्याने केला. पण हा विचार फार वेळ त्याच्या डोक्यात टिकला नाही – उलट वाटेल ते करून आपण डीटीला मदत केलीच पाहिजे असं त्यानं ठरवलं.

किल्ल्यावर कोणी नव्हतं. अगदी चिटपाखरूसुद्धा. अन्यानं सायकल एका ठिकाणी कुलूप लावून ठेवली आणि तो त्या पड-लेल्या तटाजवळ आला. त्याला काही निराळं दिसत नव्हतं. तेच दगड – तीच घसरण – तीच झाडंझुडपं... त्यामुळे त्याला काहीच सुचेना. त्यामुळे तो कंटाळला.

किल्ल्याच्या सगळ्या बाजूनं चक्कर मारायची त्यानं ठरवलं. त्याप्रमाणे त्याने सुरवात केली.

यासाठी कोसळलेल्या तटापासून त्याने खाडीच्या दिशेने चालायला सुरुवात केली... तो काय आश्चर्य ! ... त्याला रस्त्यात एक रुमाल दिसला. त्याने उचलून पाहिला तो काय ! तो डीटीचा रुमाल होता. रुमालाच्या कोपऱ्यावर D हे भरलेलं अक्षर त्याला स्पष्ट दिसत होतं. काहीतरी मिळालं याचा त्याला आनंद झाला; पण डीटीचा रुमाल इकडे आला... म्हणजे तो कुठे गेला असेल याची त्याला काळजी पडली... तो तसाच पुढे जाऊ लागला. एका ठिकाणी त्याला झुडपं दबलेली– वेडीवाकडी झालेली दिसली. त्या ठिकाणी अन्या थांबला... या ठिकाणी काहीतरी मारामारी नाहीतर झोंबाझोंबी झाली असावी असा अन्यानं तर्क केला. आणि आणखी माहिती मिळवण्यासाठी तो खाडीच्या दिशेने पुढे झाला...

खाडीच्या दिशेने बरीच पावलं उमटलेली दिसत होती. त्यामुळे त्याला काहीच तर्क बांधता येत नव्हते .. तरी तो शोध घेत होता.

इतक्यात दूरवरून एक जीप येताना त्याला दिसली. ती जीप किल्ल्यातच शिरत होती. किल्ल्यात आल्यावर जीप थांबली आणि त्यातून साळवीसाहेब व एकदोन शिपाई उतरलेले अन्याने पाहिले.

साळवींना पाहिल्यावर अन्या घाबरला. आणि पुढचे शोधण्याचं काम बंद करून तो आपल्या सायकलीकडे वळू लागला. दूरवरून साळवींना त्याची ही हालचाल दिसली. त्यांनी तावडतोब आपले शिपाई पाठवून अन्याला बोलावून घेतलं. अनायसे साळवी किल्ल्यात भेटले आहेत, तेव्हा त्यांना डीटीबद्दल सांगावं असं अन्याच्या मनात आलं तो काही बोलणार तोच साळवी गरजले–

'कायरे इथे काय करतो ? काय नाव तुझं ?'

अन्यानं नाव सांगितलं. साळवींनीं आपल्याला ओळखलं नाही याबद्दल अन्याचीं खात्री पटली.

'बोल काय करीत होतास ?'

'किल्ल्याची चित्रं काढायचीत आहेत मला. शाळेतल्या प्रदर्शनासाठी.' अन्याला थाप सुचली.

'जा जा...इथे येऊ नको. किल्ला पडलाय कळत नाही तुला. जा' साळवींनी अन्याला हाकललं. त्यालाहीं ते हवंच होतं. मात्र या गडबडीत डीटीबद्दल सांगायचा धीर अन्याला झाला नाही. तो मुकाट्याने रामनगरला परतला.

• •

सुयशमध्ये तातडीची सभा भरली. अन्या उत्साहाने किल्ल्यावरून काहीतरी खास वातमी घेऊन आला होता हे त्याच्या चेहऱ्यावरून स्पष्ट दिसत होते. सभेला सुरवात झाल्याबरोबर अन्यानं सगळी हकिगत सांगितली.

'तू तिथेच साळवींना सांगून टाकायचंस.' रम्या म्हणाला.

'सांगायचं काय ! मी डीटीबद्दल काहीं बोलली असतो म्हणजे त्यांनी मलाच अडकवून ठेवलं असतं.' अन्या.

'बरं मग आता करायचं काय ?' पमी.

'ठरवू या.' रम्या.

'एक नक्की की डीटी कशात तरी अडकला आहे. आपण त्याला सोडवायलाच हवं...कारण तो आता आपल्या मदतीची अपेक्षा करीत असेल.' अन्या.

'आपण कसं सोडवणार ?'

'कसं म्हणजे ! तो इथे बसून थोडाच सुटणार आहे ! आपण किल्ल्यावर जायला हवं.'

'आपण ?'

'हं, आपण तिघांनीं जायचं– आणि तेही आता.' अन्या म्हणाला.

'कुठे जाणार रे !' पमीच्या आईनं विचारल्यावर तिघं दचकली. त्यांना कल्पनाही नव्हती. पमींची आई बाहेर गेली होती म्हणून तर त्यांनी निर्धास्तपणे सभा चालवली होती. तिघंजण सभेत इतके रंगून गेले होते की बाहेरून येऊन पमीची आई आपली बोलणी ऐकत आहे याचे भानही त्यांना राहिलं नव्हतं. पण आता सांगितल्याशिवाय त्यांची सुटका नव्हती. सगळेजण एकमेकांकडे पाहू लागले.

पमीच्या आईने पुन्हा विचारलं,

'कायरे, बोलता येत नाही का तुम्हांला ? काय पमे कुठे जाणार ? नीट मला सांगा.'

आईच्या शब्दातला दम पमीनं ओळखला. ती म्हणाली,

'किल्ल्यावर.'

पमीची आई दचकली.

'किल्ल्यावर ! कशाला ? कायरे अन्या !'

'डींटीला पाहायला.' अन्या म्हणाला.

'डीटीला पाहायला ! म्हणजे ?'

आता आईला सांगितल्याशिवाय गत्यंतरच नव्हतं...हे पाहून पमीनं सगळी हकीगत आईच्या कानावर घातली. ती सगळी हकीगत ऐकल्यावर मात्र पमीची आई भयंकर संतापून म्हणाली,

'काट्यांनो, काय झालंय काय तुम्हांला! काही अक्कल आहे की नाही! जोशीबाईंच्या देवांची एक गंमत केलीत ते ठीक झालं. पण हे काय हे? किल्ल्यात रात्री-अपरात्री राहायचं!'

'पण आई...' पमी काही बोलणार होती.

'एक शब्द बोलू नकोस...तुम्ही कुठे हालायचं नाही इथून. रम्या तू सरळ घरी जा...नाहीतर थांब, मी तुझ्याकडे येते.'

'नको, माझ्या घरी माहीत आहे.' रम्या म्हणाला. त्याबरोबर अन्या आणि पमी दचकून त्याच्याकडे पाहू लागली.

'माझ्या बाबांना मी डीटीबद्दल विचारलं होतं'. रम्या सांगू लागला

'विचारलं! म्हणजे?' पमीच्या आईला काही समजेना.

'अग याचे बाबा ज्योतिषी आहेत. ते कुंडली मांडून प्रश्न सांगतात.' अन्या म्हणाला.

'मग काय म्हणाले तुझे बाबा?' पमीच्या आईने विचारलं.

'त्यांना काही सांगता आलं नाही.' रम्या.

'जा तू. सरळ तुझ्या घरी जा आणि कुठेही बाहेर जाऊ नकोस.' पमीच्या आईने रम्याला सांगितलं.

'अग पण डीटीला मदत करायला नको?' पमीनं विचारलं.

'मी सांगते साळवीसाहेबांना.'

'साळवींना!' अन्या ओरडला.

'हो हो साळवींना. ही कामे त्यांची आहेत. तुमच्यासारख्या पोरांची नाहीत, समजलं?'

...४

'अग पण तो आमची वाट पाहात असेल.'

'तरी तुम्ही इथून हालायचं नाही–'

'मग आई मी पुन्हा डीटीकडे जाऊन बघून येतो.' अन्या म्हणाला.

'काही नको. तुम्ही हलू नका... मीच जाते. चल रम्या, मी येते तुझ्याबरोबर.' पमीची आई रम्याला म्हणाली आणि अन्या-पमीला खोलीत कोंडून ठेवून – तिनं घराला बाहेरून कुलूप लावून घेतलं आणि रम्याबरोबर बाहेर पडली.

● ●

अन्या वैतागला. दरवाजाला कुलूप आणि खिडक्यांनाही गज, त्यामुळे बाहेर पडणं अशक्य होते. काय करावे हे दोघांनाही सुचेना.

पमीसुद्धा आईवर अतिशय रागावली होती. एवढं सांगूनसुद्धा डीटीच्या मदतीसाठी आपल्याला पाठवलं नाही याचा तिला फार राग आला होता. पण आता इथं नुसतं बसण्यापेक्षा काही करणं शक्य नव्हतं... आता गावभर बोंबाबोंब होणार होती. या सगळ्या विचारानं ती अस्वस्थ झाली.

एवढ्यात अन्या ओरडला – पमे ऽऽऽ... पमीनं अन्याकडे पाहिलं... अन्यानं एका तारेच्या मदतीनं–आतल्या दरवाजाची कडी व्हेंटिलेटरमधून हात घालून उघडली होती. त्यामुळे आतला दरवाजा उघडला. दोघांची सुटका झाली. दोघे मागच्या दरवाजाने बाहेर सटकले. सटकण्यापूर्वी घरातलं एक दुसरं कुलूप मागच्या दाराला पमीनं लावलं.

□ □

# ७. गोंधळ

रम्याला घेऊन पमीची आई रम्याकडे आली......

आपली परवानगी न घेता सगळी पोरं किल्ल्यावर जाणार होती हे ऐकल्यावर तर रम्याची आई जास्तच संतापली. ती आणि पमीची आई दोघी – बोलू लागल्या.

'कमाल आहे हो पोरांची.'

'अहो मला ऐकायला मिळाले म्हणून समजलं तरी – नाहीतर या पोरांनी कसलाच पत्ता लागू दिला नसता.'

'मग तुमची मुलं कुठाहेत ?'

'त्यांना ठेवलंय घरात...... तुम्हाला मुद्दाम सांगायला आलेय मी. तुम्हाला वेळ असला तर आपण रांगणेकर बाईंकडे जाऊ. येता का ?'

'अहो ती दोघे घरात नाहीत तेवढ्यात तो डीटी का दिनू...तो किल्ल्यावर गेला.'

'तो एक धाडशी पोरगा आहे.'

'हुशारही आहे, पण हे कसले उद्योग !'

'चला मी आलेच.' असं म्हणून रम्याची आई पमीच्या आई-बरोबर रांगणेकरांकडे निघाली. जाण्यापूर्वी तिनं रम्याला बाबां-जवळ बसवला होता. रम्याचं सारखं मी येतो, मी येतो चाललं होतं. पण त्याच्या आईनं त्याचं काही जुमानलं नाही. रम्याच्या बाबांनाही 'रम्यावर लक्ष द्या.' असं सांगून त्या निघाल्या.

रम्या वैतागला. त्यानं बाबांजवळ सारखी भुणभूण सुरू केली. त्याचे बाबा एक कुंडली समोर घेऊन बसले होते. त्यामुळे त्यांचं

रम्याच्या बोलण्याकडे लक्ष नव्हतं. तरी पण रम्याच्या आईनं बजावलेलं असल्यामुळे ते रम्याचं काहीएक ऐकून घेत नव्हते.

रम्याला घरातून पळून जावसं वाटलं, पण तो एकटा कुठे जाणार होता ! आताच पमीच्या आईच्या सांगण्यावरून पमी आणि अन्या या दोघांना घरात अडकवून ठेवल्याचं समजलं होतं. त्यामुळे तर तो जास्तच वैतागला. एवढ्यात त्याला ओळखीची शीळ ऐकू आली.

शूऽऽवीक शूऽऽवीक.........

ती शीळ अन्याची हे त्यानं ओळखलं. तो बाबांशी काही न बोलता खिडकीजवळ आला. खिडकीतून बाहेर पाहिलं तर अन्या आणि पमी दोघं त्याला बोलावत असल्याचं दिसलं. आता घरातून बाहेर गेलंच पाहिजे असं त्यानं ठरवलं आणि मागच्या दाराने मागच्या अंगणात येऊन तिथून हळूच बाहेर सटकला आणि पमी व अन्या यांना जाऊन मिळाला.

'कायरे अन्या ?'

'चल.'

'कुठे ?'

'किल्ल्यावर.'

'आता !'

'हं आताच.'

'आताच जायला हवं रम्या.' पमी म्हणाली. त्याबरोबर रम्यानं आपल्या घराकडे पाहिलं. कसलीही हालचाल दिसली नाही त्यावरून बाबा कुंडली पाहण्यात अडकलेत हे त्याच्या लक्षात आलं. आणि आता पळायला हरकत नाही असं ठरवून त्यानं अन्या व पमीला खूण केली. तिघंही किल्ल्याकडे पळाले

● ●

सकाळ झाली तेव्हा डीटीला त्या खोलीत गाढ झोप लागली होती. कारण रात्रीच्या प्रकारानं तो इतका दमून गेला की आपल्याला गुंडांनी खोलीत कोंडून ठेवलंय आणि सकाळी कदाचित ते समुद्रात फेकून देतील या गोष्टीचंही त्याला भान राहिलं नव्हतं. त्यामुळे सकाळी काही माणसं खोलीत आली आणि त्यांनी डीटीला पाहिलं. डीटीच्या एकूण अवस्थेवरून तो आपल्या पाळतीवर असण्याची शक्यता असेल असं कोणासही वाटलं नाही. खोलीत आलेल्या माणसांपैकी मुख्य माणसानं डीटीच्या तोंडावर पाणी फेकलं... डीटीनं झोपेतच तोंडावरून हात फिरवला. आणि कूस बदलून पुन्हा झोपी गेला... तो माणूस डीटीला उठवणार इतक्यात बाहेरून आणखी एक माणूस घाईघाईने आत आला आणि त्या माणसाच्या कानात काही पुटपुटला. तसं तो माणूस चटकन उठला आणि सगळे घाईघाईने बाहेर निघाले. बाहेर पडण्यापूर्वी पुन्हा त्यांनी खोलीला कुलूप लावलं.

• •

पमीची आई आणि रम्याची आई दोघी रांगणेकरांकडे आल्या. तेव्हा घरात कोणी नव्हतं... त्या परतणार इतक्यात त्यांना गोविंदा दिसला. (गोविंदा हा सखूचा नवरा. जोशीबाईकडे झालेल्या चांदीच्या देवांच्या चोरीबद्दल हिला साळवींनी अटक केली होती. डिटेक्टिव्ह डीटी आणि कंपूनी ते रहस्य शोधून काढलं होतं.) त्यांनी गोविंदाजवळ चवकशी करायला सुरवात केली.

'कायरे रांगणेकर कुठाहेत ?'

'साहेब आणि बाई दोघं मुंबईला गेलेत.'

'केव्हा येणार ?' रम्याच्या आईने विचारलं.

'आजच.'

'आणि दिनेश कुठे आहे ?' रम्याच्या आईने काही माहीत नाही असं दाखवीत गोविंदाला विचारलं.

'धाकले धनी आपल्या मित्राकडे गेले आहेत.'

'कोण मित्र ?'

'माहीत नाही बा. आज सकाळी ९ वाजता येणार होते, पण आले नाहीत.'

गोविंदाला काही माहीत नाही असं लक्षात आल्यावर रम्याच्या आईने गोविंदाला थोडक्यात सगळी हकिगत सांगितली. ती हकिगत ऐकून गोविंदा सर्दच झाला. त्याने पोलिसांना फोन करून कळवण्याची विनंती केली. तशा त्या दोघी एकमेकींकडे पाहू लागल्या.

'तुम्ही करा फोन. मला सवय नाही बाई.' रम्याची आई पमीच्या आईला म्हणाली.

'मलाही कुठे सवय!'

'मी फून लावून देतो. आपण बोला.' गोविंदा बोलला.

तेव्हा दोघी कशाबशा कबूल झाल्या.

'हॅलू......' गोविंदा फोनवर बोलत होता......

'पुलीस स्टेशन हवय... मी रांगणेकरांच्या घरातून बोलतोय. व्हय व्हय......' असं म्हणत त्याने फोन पमीच्या आईजवळ दिला. पमीच्या आईनं घाबरतच रिसिव्हर आपल्या कानाशी नेला. सुरवातीला तर कोणता भाग कानाजवळ आणि कोणता तोंडाजवळ न्यायचा हेही त्यांना समजलं नव्हतं. गोविंदानं त्यांना समजावून सांगितल्यावर त्यांनी फोनवर बोलायला सुरवात केली.

— 'हॅलो ऽऽ'

कोणीतरी आपल्या कानाशी गुदगुल्या करीत आहे असं त्यांना वाटलं. तरी पण त्या बोलू लागल्या.

'हॅलो रामनगर पोलिस स्टेशन का ? मी निर्मला कुलकर्णी बोलतेय.'

'कुठून ?'

'कुठून म्हणजे या टेलिफोनमधून बोलतेय... ...'

रम्याची आई हसायला लागली. तेव्हा पमीच्या आईलाही हसू आलं. तेवढ्यात गोविंदा म्हणाला,

'तसं नाय बाई... मी रांगणेकरसाहेबांच्या घरातून बोलतेय असं सांगा.'

गोविंदाच्या सूचनेप्रमाणे पमीच्या आईनं फोनमधून सांगितलं आणि त्या म्हणाल्या,

'साळवीसाहेब आहेत का ? आम्हाला त्यांच्याशी बोलायचंय.'

'साळवीसाहेब नाहीत.'

'मग केव्हा येतील ?'

'आम्हीसुद्धा त्यांचीच वाट पाहात आहोत.'

'म्हणजे ?'

'ते एका कामासाठी बाहेर पडले आहेत – ते अजून आले नाहीत. त्यांच्याच शोधासाठी आम्ही निघतो आहोत.' असं म्हणून पोलिस स्टेशनवरच्या माणसानं फोन ठेवला. पमीच्या आईला धक्काच बसला. रम्याच्या आईनं त्यांना काय झालं हे विचारलं तेव्हा त्या म्हणाल्या, 'साळवीही बेपत्ता आहेत.'

'आता काय करायचं?' पमीच्या आईनं रम्याच्या आईला विचारलं.

'साळवीही बेपत्ता म्हणजे कमाल आहे.'

'आणि रांगणेकरसाहेबांचाही पत्ता नाही.'

इतक्यात गोविंदा म्हणाला –

'तुम्ही जगतापसाहेबांना सांगा... त्यांना करा फोन.'

पमीच्या आईनं पुन्हा फोन करायला नकार दिला. आधीच पोलिस स्टेशनवर एक फोन करताना त्यांचा जीव खालीवर होत होता. त्यात आता दुसरा फोन आणि तोसुद्धा इन्स्पेक्टर जगतापसाहेबांना !

'नको ग बाई.' म्हणून त्या मागे सरल्या.

रम्याच्या आईची फोनला हात लावायची हिंमत होत नव्हती. त्या गोविंदाला म्हणाल्या,

'तू जातोस का पोलिस स्टेशनवर. तू येईपर्यंत आम्ही बसतो इथं.'

गोविंदा म्हणाला –

'नको – मी नाही जात. साहेब आणि बाई आता येतील.'

'मग आपण त्यांनाच भेटून जाऊ या.' निर्मलाबाई (पमीची आई) म्हणाल्या.

दोघीजणी बराच वेळ थांबल्या, तरी रांगणेकर आले नाहीत. शेवटी रांगणेकरसाहेब घरी आल्यावर त्यांना आमचा निरोप म्हणून सगळी हकिगत सांग असं सांगून त्या दोघी घरी परतल्या.

घरी जाताना निर्मलाबाईंनी – प्रभाताईंना (रम्याची आई) मुद्दाम आपल्या घरी नेलं. आणि बाहेरचं कुलूप काढून त्या अन्याच्या खोलीत आल्या. तो काय !

पोरं पळालेली...

त्या मटकन खालीच बसल्या.

'गेली कुठे पोरं ?' प्रभाताईंनी विचारलं.

'कुणास ठाऊक...' असं म्हणून निर्मलाताई कशाबशा उठल्या आणि सगळं घर धुंडाळू लागल्या. घरात कुठेही पोरं नव्हती. बरं खिडकीतून पोरं पळणंही शक्य नव्हतं. गेली कुठे याचा विचार करीत असतानाच त्या मागच्या दरवाजाशी पोचल्या. ते दार आतून उघडं – म्हणजे कडी नव्हती. हे पाहून त्या दचकल्या. त्यांनी दार उघडण्याचा प्रयत्न केल्यावर त्याला बाहेरून कोणीतरी कडी घालून बंद केल्याचं लक्षात आलं. त्या झटकन पुढच्या दारी येऊन घराला वळसा घालून मागीलदारी आल्या तर काय ! मागच्या दाराला कुलूप लावलेलं. आता त्यांच्या लक्षात पोरांचे प्रताप आले. त्या पुन्हा घरात आल्या– त्यांनी बराच विचार केला पण अन्याची खोली बाहेरून कोणी उघडली हे काही त्यांच्या लक्षात येईना.

'काय करावं या पोरांना... काही समजत नाही.'

'तेच म्हणते मी. या वयात कसले हे खेळ !' प्रभाताईंनी री ओढली.

दोघीजणी आपल्या मुलांचे प्रताप एकमेकींना सांगू लागल्या.

● ●

निर्मलाताईंचा निरोप घेऊन प्रभाताई आपल्या घरी आल्या तेव्हा रम्याचे वडील अजून कुंडलीतच रमले असल्याचं त्यांनी पाहिलं. दरवाजातून त्या किंचाळल्या –

'कायहो रम्या कुठाय ? '

हा प्रश्न ऐकल्यावर रम्याच्या वडिलांनी रम्याला शोधायला सुरवात केली.

पण रम्या घरातच नव्हता तर सापडणार कुठून! तिघं पोरं या वेळी किल्ल्यात होती.

• •

तिघं पोरं या वेळी किल्ल्यावर फिरत होती. आतासुद्धा किल्ल्यावर कोणी नव्हतं. तरीसुद्धा आपण जपूनच पाहणी केली पाहिजे असं अन्यानं दोघांना बजावलं आणि प्रत्यक्ष किल्ल्यापेक्षा... किल्ल्याच्या आसपास एखादं घर किंवा खोली दिसते का ती पहा असं त्याने सांगितले.

खाडीच्या दिशेने अन्या चालू लागला. ज्या ठिकाणी त्याला डीटीचा हातरुमाल सापडला होता ती जागा त्याने या दोघांना दाखविली, आणि अंदाजाने डीटी ज्या वाटेने गेला असेल त्या वाटेने तो पुढेपुढे जाऊ लागला...आता पुढे खाडी सुरू होणार होती तिथे थांबला. इतक्यात पमी ओरडली –

'दादा ते बघ एक घर...'

पमीनं दूरवर घरासारखं काहीतरी दिसत असल्याचं दाखवलं. अन्याला नीट दिसत नव्हतं. पण तिघे पुढे झाले. बराच वेळ किनाऱ्यावरून चालत आल्यावर त्यांना एक पडकं घर दिसलं. कुठला तरी जुनाट वाडा असावा असं त्यांना वाटलं. वाड्याचं दार बंद होतं. आत कोणी असेल अशी त्यांना शंकासुद्धा आली नाही. सहजच अन्यानं तिथे शीळ घातली...शूऽऽवीक शूऽऽवीक.

तर काय आश्चर्य...

अन्याच्या शीळेला उत्तर शीळेनेच मिळालं – शूऽऽवीक शूऽऽवीक.

□ □ □

# ८. डीटी सापडला – पण

प्रभाताई रागानं बेभान झाल्या होत्या. त्यांनी सगळा राग रम्याच्या वडिलांवर काढायला सुरवात केली. त्यांच्या समोरच्या कुंडल्या आणि कागद त्यांनी फेकून देण्यासाठी उचलले तेव्हा तर दोघांची जामच जुंपली.

अर्धा-पाऊणतास दोघं भांडत होते. शेवटी दमून दोघं थंड झाली तेव्हा प्रभाताईंनी दत्तोपंतांना विचारलं –

'मग आता काय करायचं?'

'आपण कुलकर्ण्यांकडे जाऊ.'

'आणि?'

'तिथून रांगणेकरांकडे. नाहीतर आपण सरळ पोलिस स्टेशन-वरच जाऊ या.'

'चला – हा शहाणपणा आधीच सुचला असता तर!' पुन्हा प्रभाताईंनी आपलं तोंड सुरू केलं.

दत्तोपंत म्हणजे रम्याचे वडील, आणि प्रभाताई दोघं घराबाहेर पडले. आणि प्रथम कुलकर्ण्यांकडेच आले. निर्मलाताई अस्वस्थ झाल्या होत्या. कामत पति-पत्नींना पाहून त्यांनी विचारलं –

'पोरं तुमच्याकडे आहेत?'

'छे हो. आमचा रम्याही नाहीए.'

'म्हणजे?'

'सगळी किल्ल्यावर पळाली.' दत्तोपंत थंडपणे बोलत होते.

'बाकी कमाल आहे नाही पोरांची ! या वयात कसलं धाडस हे ! आम्ही लहान होतो तेव्हा......'

'तुमचं राहू द्या हो.' प्रभाताईंनी दत्तोपंतांचं तोंड मध्येच बंद करून त्या निर्मलाताईंना म्हणाल्या,

'निर्मलाबाई, चला पोलिस स्टेशनवर. आपण जाऊन तिथे खबर देऊ, म्हणजे पोलिस किल्ल्यात जाऊन मुलांची चौकशी करतील.'

'चला.' असं म्हणून घराला कुलूप लावून त्या प्रभाताई-बरोबर बाहेर पडल्या.

'आधी आपण रांगणेकरांकडे जायचं कां?' त्यांनी वाटेत प्रभाताईंना विचारलं.

'मी तेच म्हणतो की आपण तिथे जाऊ....' दत्तोपंत.

'काही नको, आपण सरळ पोलिस स्टेशनवर जाऊ या.' प्रभाताई.

'नाही पण पोरं तिथे असली तर!' दत्तोपंतांनी शंका काढली. ते पुढे म्हणाले–

'नाही, आपण पोलिसात तक्रार करायला जाण्यापूर्वी नीट चव-कशी करायला हवी. नाहीतर पोरं त्यांच्या घरात खेळत असायची आणि आपण उगीच तक्रार करून पोलिसांसमोर आपलीच गंमत व्हायची. शिवाय आता पोरं झाली आहेत हुशार. तेव्हा...'

'तुमचं राहू द्या हो. तुम्हाला साधं लक्ष ठेवता आलं नाही रस्त्यावर.' असं म्हणून प्रभाताईंनी आपल्या यजमानांचा गाढवपणा निर्मलाताईंना भर रस्त्यात मोठमोठ्यांनी सांगायला सुरवात

केली. दत्तोपंतांना अगदी लाजल्यासारखं झालं. पण त्यांचा पत्नी-पुढे काही इलाज चालत नसे. आपल्याच कुंडलीतले ग्रह वाईट असं म्हणून ते शांत राहात.

तिघंजण पोलिस स्टेशनवर आली.

पोलिस स्टेशन हे एखाद्या रेल्वे स्टेशनसारखे ऐसपैस नाहीतर एखादी मोठी इमारत असावी अशी प्रभाताईंची कल्पना होती. त्यामुळे एका जुनाट आणि कोंदट खोलीबाहेर रामनगर पोलिस स्टेशन ही पाटी वाचल्यावर त्यांनी आत बसलेल्या एका पोलिसास विचारले –

'काय हो, पोलिस स्टेशन कुठे आहे ?'

हा प्रश्न विचारणाऱ्या बाईचं डोकं तर फिरलं नाही अशी त्या पोलिसास शंका आली. त्याने त्या तिघांकडे नीट पाहिले आणि म्हणाला, 'हेच की, ही पाटी वाचा.'

कडुलिंबाचं पान खाल्यागत चेहरा करून तिघं पोलिस स्टेशनात शिरले. आत गेल्याबरोबर त्यांना घाणेरडा वास आला. तिघांनी आपल्या नाकाशी रुमाल धरले.

नुकत्याच पकडलेल्या घाणेरड्या दारूचे डबे तिथेच कोपऱ्यात ठेवले होते. त्यामुळे आधीच कोंदट असलेल्या खोलीत ही दुर्गंधी पसरली होती.

समोरच्या टेबलावर एकजण बसला होता. त्याने आपल्या नेहमीच्या दमदार आवाजात विचारायला सुरवात केली.

'काय हवंय ?'

तिघं एकमेकांकडे पाहू लागली. प्रभाताई दत्तोपंतांना तुम्ही बोला अशा खुणा करू लागल्या. दत्तोपंतांनी मी नाही, तूच बोल अशा अर्थी खुणांनीच उत्तर दिलं.

तिघांच्या या खाणाखुणा पाहून तो माणूस जास्तच वैतागला आणि ओरडला–

'खाणाखुणा कसल्या करता? काय हवय?'

शेवटी प्रभाताईंनी सांगायला सुरवात केली... जवळजवळ पंधरा मिनिटं त्या चारही पोरांचं पुराण सांगत होत्या... ते सगळं ऐकल्यावर वैतागून त्या माणसानं विचारलं –

'मग इथे पोलिस स्टेशनात काय काम हे?'

तिघांना या प्रश्नाचं आश्चर्य वाटलं. कसाबसा धीर करून दत्तोपंत त्याला म्हणाले–

'अहो काम म्हणजे काय! आमची पोरं नाहीशी झालीत ती कंप्लेंट करायला आलोत आम्ही.'

'मंग आल्यासरसी हे सांगायचं, का सम्दा सिनेमा सांगत बसायचं! तुम्हा शिकलेल्या मानसांना कधी अकला यायच्या कुनास ठाऊक!' असं म्हणून त्यानं आपल्यासमोरचं एक रजिस्टर उघडलं. आणि सांगा कंप्लेंट म्हणून लिहायला सुरवात केली.

प्रभाताईंनी कपाळाला हात लावला.

निर्मलाताईंनी तर आपल्या नाकावरचा रुमाल आल्यापासून कायम ठेवला होता.

प्रभाताईंनी पुन्हा सुमारे अर्ध्या तासात त्या माणसाला हवी तशी कंप्लेंट लिहून दिली आणि तिघंही बाहेर पडले. बाहेर पडल्या-वर तिघांना एकदम हायसं वाटलं. दत्तोपंत तर सरळ बोलले–

'हॅ ! यापेक्षा पोरगं हरवलेलं बरं.'

त्या वेळी त्यांनी प्रभाताईंकडे पाहिलं नाही म्हणून ठीक, नाहीतर प्रभाताईंचा आवेश असा होता की रस्त्यातला एखादा धोंडा घेऊन तो सरळ दत्तोपंतांना मारावा...पण हे काही न होता तिघं परतले. वाटेत त्यांची याच विषयावर चर्चा चालली होती– घरी जाण्यापूर्वी एकदा रांगणेकरांकडे जाऊन ते आले असते तर त्यांच्याही कानी सगळ्या गोष्टी नीट घालाव्यात असं ठरवून तिघं रांगणेकरांच्या घराच्या दिशेने निघाले.

वाटेतच त्यांना एक पोलिस व्हॅन उभी दिसली. व्हॅनमध्ये असलेल्या पोलिसाला दत्तोपंतांनी विचारलं –

'कोण आहेत ?'

'इन्स्पेक्टर जगताप'

इन्स्पेक्टर जगतापांचं नाव ऐकल्यावर प्रभाताई आणि निर्मलाताई दोघी दचकल्या. दोघींनी दत्तोपंतांना हळूच सांगितलं –

'अहो त्यांच्या कानावर घाला. ते पोरांच्या कंपूला चांगले ओळखतात.'

दत्तोपंतांनी पोलिसाला जगतापांशी बोलायचंय म्हणून सांगितलं.

पोलिस व्हॅनमधल्या वायरलेस सेटवरून जगताप कोणाशी तरी बोलत होते. ते बोलणं संपेपर्यंत दहा मिनिटं झाली. तेवढ्या वेळात या तिघांची चुळबूळ सुरू होती; पण दुसरं काही करणं शक्य नसल्यामुळे तिघं नुसते एकमेकांना इन्स्पेक्टर साहेबांचं बोलणं कधी संपणार याच्या खुणा करीत होते.

आपले काम आटोपल्यावर इन्स्पेक्टर जगतापांनी या तिघां-कडे पाहिलं. दत्तोपंतांनी थोडक्यात स्वतःचा परिचय करून दिला आणि प्रभाताईंनी डीटीच्या कंपूनं घातलेला गोंधळ शक्य तितक्या कमी शब्दांत सांगण्याच्या प्रयत्नात पंधरा मिनिटं घेतली.

इन्स्पेक्टर जगतापही चकित झाले.

'म्हणजे डीटी बेपत्ता आहे!'

'हो ना.'

'आणि दुसरी पोरं?'

'तीही बहुतेक किल्ल्यात त्याच्या मदतीसाठी गेली आहेत.'

'पण तुम्ही रांगणेकरांच्या घरी जाऊन पाहिलंत का?'

'हो, ती दोघं गावाला गेली आहेत.'

'आणि डीटी?'

'तीच संधी साधून तो किल्ल्यात गेला. त्यांनी एक अनोळखा चेहरा पाहिला. त्याचे रहस्य शोधायला गेला तो!'

'असं! वेडा आहे तो. आम्हीसुद्धा त्या माणसांच्या जागेत चटकन शिरत नाही आणि हा एकटा गेला?'

'पण आमची पोरं सुरक्षित असतील ना!'

'तुम्ही आता काळजी करू नका. माझ्याबरोबर चला.'

'कुठे?'

'प्रथम आपण रांगणेकरांकडे जाऊ आणि तिथून किल्ल्यात जाऊ. बरं झालं मला तुम्ही भेटलात. नाही तर मी आता काही सशस्त्र शिपाई नेऊन तिथे फायरिंग सुरू करणार होतो.'

'फायरिंग!'

'हं. पण तुम्ही काळजी करू नका. चला माझ्याबरोबर.'

तिघंजण त्या व्हॅनमध्ये बसले आणि रांगणेकरांकडे निघाले. प्रभाताई आणि निर्मलाताई—दोघींचा जीव घाबरा झाला होता. आपली पोरं भयंकर मोठ्या संकटात अडकली आहेत याची त्यांना खात्री पटली. त्यातल्या त्यात इन्स्पेक्टर जगताप भेटले आणि त्यांना सगळी हकिगत समजली, ही एकच समाधानाची गोष्ट होती. रांगणेकरांच्या घरी सगळे निघाले तेव्हा त्यांच्या घरी काय गोंधळ उडाला असेल याची कल्पना दत्तोपंतांनी केली. त्यांच्या डोळ्यांसमोर सगळं चित्र उभं राहिलं...

रांगणेकर गावाहून आले असतील. डीटी बेपत्ता झाला हे त्यांना समजलं असेल आणि मग काय ! .........

गाडी सरदारनगरात वळली. आणि डीटीच्या घराजवळ आली. घराची दिंडी बंद होती. सगळीकडे सामसूम दिसत होतं. त्यामुळे अजून डीटीचे पपा आणि ममी गावाहून आले नसावेत अशी त्या तिघांची समजूत झाली. गाडीतून उतरून सगळे आत आले.

इन्स्पेक्टर जगतापानी बाहेरची बेल वाजवली. थोड्या वेळानं दार उघडलं तो काय आश्चर्य !

दरवाजा डीटीनंच उघडला होता.

डीटीला घरी पाहून तिघांचा चेहरा पांढराफटक पडला.

इन्स्पेक्टर जगताप हसून म्हणाले—

'काय हो ! काय सांगता तुम्ही !'

'काय झालं जगतापसाहेब ?'

प्रभाताई आणि निर्मलाताई यांची बोबडीच वळली. त्यांना काही बोलता येईना.

इन्स्पेक्टर जगतापसाहेब मात्र लगेच निघाले. ते जाताना डीटीला सॉरी म्हणाले आणि घाईघाईने व्हॅनजवळ आले. ते व्हॅनमध्ये बसून व्हॅन सुरू होणार इतक्यात डीटी घाईघाईने, तिथे आला आणि त्याने काही कागद इन्स्पेक्टर जगतापांच्या हातात दिले. जगतापांनी घाईघाईने ते कागद पाहिले आणि ते डीटीकडे बघतच बसले. त्यांच्या आश्चर्याला पारावार नव्हता.

एवढ्यात डीटीनं त्यांच्या कानात काही सांगितले आणि म्हणाला, 'मी येऊ. मी दाखवतो ती जागा.'

'चल चल.' असं म्हणून त्यांनी डीटीला व्हॅनमध्ये बसवला आणि गाडी सुरू करण्यापूर्वी घरात जमलेल्या तिघांकडे पाहून ते ओरडले.

'मिस्टर कामत तुम्ही इथेच बसा. आम्ही तुमच्या पोरांना घेऊन येतो. जाऊ नका. रांगणेकर आले तर त्यांनाही माझा [illegible] उत्तर ऐकण्याच्या आत त्यांची गाडी रामनगर सोडून भरधाव किल्ल्याकडे निघाली.

एकामागून एक घडणाऱ्या धक्कादायक घटनांमुळे डीटीच्या घरात आलेल्या तिघांची परिस्थिती अतिशय चमत्कारिक झाली होती. ज्या डीटीसाठी एवढं रामायण झालं होतं तो तर आपल्या घरात सुरक्षित होता. बरं तो इन्स्पेक्टर जगतापांच्या कानात काय पुटपुटला हेही त्यांना कळलं नाही. काही क्षणापूर्वीच जगतापांनी डीटीला वे [illegible] आता त्या[illegible]

BVBK-0400308